# शरच्चंद्र एक अभ्यास

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. २८०९

REFBK-0022605

प्रा. म. ना. लोही

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक / मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

2 JAN 1980

(क्र.मा.प.)

# शरच्चंद्र : एक अभ्यास

लेखक

प्रा. म. ना. लोही, एम्. ए.

मूल्य : ४–००

REFBK-0022605

नूतन प्रकाशन, पुणे ३०

प्रकाशन क्र. २५
दि. १-१-१९७७

© म. ना. लोही

प्रकाशक :
गो. के. जोगळेकर,
नूतन प्रकाशन,
२१८१ सदाशिव पेठ, पुणे ३०.

मुद्रक :
शां. का. राऊळ,
स्वाती मुद्रणालय,
६६ नवी पेठ, पुणे ४११ ०३०.

## अर्पणपत्रिका

मराठीचे थोर नाटककार व दिग्दर्शक

तसेच

मराठी वाचकांना शरच्चंद्रांचा परिचय व्हावा

अशी उत्कट इच्छा बाळगणारे,

मला पितृतुल्य

कै. वा. वा. भोळे

यांच्या

पवित्र स्मृतीस –

## लेखकाचे मनोगत

काही योगायोग अविस्मरणीय असतात ! प्रस्तुत पुस्तकाच्या निमित्ताने याचा चांगलाच प्रत्यय आला. सुमारे एक तपापूर्वी कै. वा. वा. ऊर्फ तात्यासाहेब भोळे ( २ नोव्हेंबर १९७६ रोजी दिवंगत झालेले सुप्रसिद्ध मराठी कादंबरीकार व नाट्य समीक्षक) यांनी शरच्चंद्रांवरचा आपला लेख माझ्या स्वाधीन केला आणि शरच्चंद्रांसंबंधी १९५० पर्यंत उपलब्ध असलेल्या माहितीच्या आधारे त्यांचा मराठी वाचकांना प्रथम परिचय करून दिल्याचे अभिमानाने सांगितले. त्याच सुमारास मी शरच्चंद्रांवर दोन लेख लिहिले होते म्हणून त्यांनी आवर्जून आपला लेख माझ्या स्वाधीन केला. त्यानंतर ते नागपूर सोडून मुंबईला गेले. आज माझे हे पुस्तक प्रसिद्ध झालेले बघायला ते नाहीत याची मनाला खंत वाटते.

प्रस्तुत पुस्तक म्हणजे कै. शरच्चंद्र चटोपाध्याय यांना त्यांच्या जन्मशताब्दीनिमित्त एका वाचकाने वाहिलेली विनम्र श्रद्धांजली होय ! शरच्चंद्रांनी बंगाली भाषतून लेखन केले. त्यांच्या बंगाली कादंबऱ्यांचे मराठी अनुवाद करून कै. भा. वि. उर्फ मामा वरेरकरांनी मराठी वाचकांवर फार मोठे उपकार केले आहेत. त्यामुळेच मराठी वाचकांना शरच्चंद्रांच्या वाङ्मयाची महती कळली. वास्तविक बंगाली व मराठी जनजीवनात जमीन अस्मानाचे अंतर आहे. पण शरदबाबूंच्या कादंबऱ्यांचा आत्मा भारतीय असल्याने त्यांच्यात परकेपणा जाणवत नाही. सध्याच्या साहित्यात मानवी मनाच्या विकृत बाजूवरच भर दिलेला आढळतो. उलट शरच्चंद्रांनी भारतीय मनातील उदात्तता प्रगट केली. काही दिवसांपूर्वी नवसाहित्याचे अभिमानी म्हणवणारे माझे एक स्नेही मला म्हणाले होते, “ शरदबाबूंच्या कादंबऱ्या फार ‘ पॉवरफुल ’ आहेत !”

कै. गुरुदेव रवींद्रनाथांची जन्मशताब्दी इ. स. १९६१ साली झाली. तेव्हापासून बंगाली साहित्याकडे माझे विशेष लक्ष वेधले. इ. स. १९५९ ते ६० साली पाच महिने कलकत्त्यात राहण्याचा योग आला आणि बंगाली साहित्याबद्दल कुतूहल निर्माण झाले, रवींद्रांच्या जन्मशताब्दीपासून शरच्चंद्रांच्या जन्मशताब्दीपर्यंत गेल्या पंधरा वर्षांत जे नैमित्तिक लेखन झाले त्याचा परिपाक म्हणजे प्रस्तुत पुस्तक होय. हे पुस्तक म्हणजे काही शरचंद्रांच्या जीवनाची व साहित्यसेवेची संपूर्ण समीक्षा नव्हे. हा त्यांचा त्रोटक परिचय आहे. तरीही शरदबाबूंच्या जीवनाचे, व्यक्तिमत्वाचे व वाङ्मयाचे बहुतेक पैलू स्वतंत्रपणे व तौलनिक दृष्टीने प्रकाशात आणण्याचा हा प्रामाणिक प्रयत्न आहे. प्रस्तुत प्रयत्नाचे कौतुक मराठी रसिक मोठ्या प्रमाणावर करतील अशी आशा आहे.

पुष्कळदा नियतकालिकातून प्रसिद्ध होणारे लेखन ग्रंथरूपाने संग्रहित न झाल्याने विस्मृतीत जाते. तसेच कदाचित् या लेखांच्या बाबतीत झाले असते. पण ' नूतन प्रकाशनचे ' चे श्री. जोगळेकर यांनी माझी पुस्तकाची योजना स्वीकृत करून आणि तातडीने पुस्तक प्रकाशित करून मला कायमचे ऋणी करून ठेवले आहे.

भगवन्त निवास,
१७ बी, लक्ष्मीनगर, नागपूर — म. ना. लोही
२५–१२–७६

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | शरच्चंद्र : व्यक्ती आणि जीवन | १ |
| २. | माणुसकीचा शोध घेणारा कादंबरीकार | १२ |
| ३. | कादंबऱ्यांतील व्यक्तिदर्शन | २० |
| ४. | शरच्चंद्रांच्या कादंबऱ्यांतील समाजदर्शन | २५ |
| ५. | बंगाली कादंबरीतील स्त्री | ३४ |
| ६. | बंगाली कादंबरीचे रवि–चंद्र | ४१ |
| ७. | भारतीय साहित्यनभातील दोन चंद्र | ४७ |
| ८. | हरिभाऊ आणि शरच्चंद्र | ५३ |
| | परिशिष्ट १ | ६२ |
| | परिशिष्ट २ | ६४ |

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

□

एक

## शरच्चंद्र : व्यक्ती आणि जीवन

शरच्चंद्रांचे जीवन एखाद्या अद्भुतरम्य कादंबरीसारखे आहे. स्वत तेच म्हणतात– "माझे संपूर्ण जीवन एका कादंबरीसारखेच आहे." नाही तरी जीवनातील विविध अनुभवांशिवाय सफल कादंबरीकार निर्माण होत नाहीच. साहित्यिकाची साहित्यसृष्टी त्याच्या जीवनानुभूतीतून साकार होते. तरीही लेखक तिच्यापासून नामानिराळाच असतो. शरच्चंद्रांच्या 'श्रीकांत,' 'देवदास,' 'चरित्रहीनं किंवा 'शेषप्रश्न' या कादंबऱ्यांमधून जेव्हा शरदबाबूंना शोधण्याचा प्रयत्न झाला तेव्हा ते म्हणाले, "लोक माझे चरित्र माझ्याच कथाकादंबऱ्यांतून शोधण्याचा प्रयत्न करतात. 'चरित्रहीन' ही माझीच कहाणी आहे असेही कोणी म्हणतात, तर कोणाला 'श्रीकांत'ची कथा ही माझीच आत्मकथा आहे असे वाटते. असा नाना तऱ्हेचा वितंडवाद माझ्या बाबतीत चालतो. मी मात्र दूर उभा राहून हसत हे सारे पाहात राहतो." सत्य शोधून काढणे कठीण आहे. पण या कादंबऱ्यांच्या नायकांच्या जीवनाचा सूर शरदबाबूंच्या जीवनाशी जुळतो यात शंका नाही.

शरदबाबूंनी आत्मचरित्र लिहिले नाही. रवींद्रनाथांनी जेव्हा त्यांना

आग्रह केला तेव्हा ते म्हणाले, "मी आत्मचरित्र लिहिणार आहे हे मला आधी ठाऊक असतं तर वेगळ्या तऱ्हेनं जीवन जगलो असतो." एका बठकीत ते म्हणाले की आत्मचरित्र लिहायला जो निर्भयपणा व सत्यवादी-पणा लागतो तो माझ्या ठिकाणी नाही. कदाचित् आपल्या पूर्वायुष्याबद्दल त्यांना खंत वाटत असेल. आज या थोर बंगाली कादंबरीकाराच्या जीवना-कडे आपण जरी कुतूहलाने व आदराने पाहात असलो तरी शरच्चंद्रांच्या काळी सनातनी विचारांच्या लोकांना त्यांच्या स्खलनशीलतेबद्दल कीव तरी येत असावी. किंवा चीड तरी वाटत असावी. विशेषत: त्यांनी आपल्या कादंबऱ्यांतून स्खलनशील स्त्री–पुरुषांचे जे उदात्त चित्रण केले ते तत्कालीन बंगाली समाजाला कितपत रुचले असेल हा प्रश्नच आहे. तथापि आपल्या भ्रमंतीत व देशाटणात त्यांनी जे जीवन पाहिले आणि अनुभवले त्याचे पडसाद त्यांच्या साहित्यसृष्टीत उमटलेले दिसतात. म्हणूनच त्यांच्या लौकिक जीवनाचा आलेख उद्‌बोधक ठरतो.

शरच्चंद्रांचा जन्म दि. १५ सप्टेंबर १८७६ रोजी हुगळी जिल्ह्यातील देवानंदपूर या गावी एका गरीब कुटुंबात झाला. वडिलांचे नाव मोतीलाल चटोपाध्याय आणि आईचे भुवनमोहिनी. या दरिद्री कुटुंबातील सात मुलांत ते दुसरे होते. शरदबाबूंच्या आजोळची परिस्थिती थोडी समाधानकारक होती' म्हणूनच शरदबाबूंचे संपूर्ण कुटुंब स्वत:चे गाव सोडून भुवनमोहिनीच्या माहेरच्या गावाला–भागलपूरला–येऊन राहिले होते. मोतीलाल साहित्यप्रेमी होते. त्यांना चित्रकलेचाही नाद होता. मोतीलाल यांना लेखनाची हौस होती. कथा, कादंबरी, नाटक, कविता, हे सर्व वाङ्‌मयप्रकार त्यांनी हाताळले, पण एकही कृती पूर्ण केली नाही. मोतीलाल स्वप्नाळू व चंचल स्वभावाचे होते. आपल्या वडिलां-संबंधी लिहिताना शरच्चंद्र म्हणतात, "वडिलांचा चंचल स्वभाव आणि उत्कट साहित्यप्रेम यापरता मला वारसाहक्कानं काही मिळालं नाही. वडिलांच्या पहिल्या गुणामुळे फार कमी वयात मी सारा भारतवर्ष फिरून आलो आणि दुसऱ्या गुणामुळे जन्मभर मी स्वप्नच पहात राहिलो.', मोतीलाल रसिक व प्रेमळ असले तरी निष्क्रीय असल्याने शरच्चंद्रांच्या आईला खूपच त्रास सोसावा लागला. भुवनमोहिनी पतिनिष्ठ व पतिपरायण

साध्वी होती. तिने पतीचा अपमान केला नाही किंवा दुसऱ्याकडून होऊ दिला नाही. पण भावाच्या आश्रयाला राहताना त्या स्वाभिमानी बाईला खूपच मनस्ताप सोसावा लागला असेल. तशात बालक शरद उनाड व स्वच्छंदी होता. शाळेचे घड्याळ पुढे करून ठेवणे, गुरुजींच्या हुक्क्यात खडे भरून ठेवणे असे प्रकार करण्यात तो सर्वांच्या पुढे असायचा. जंगलातून हिंडणे, मोडक्या तोडक्या होडीतून गंगेच्या प्रवाहावर फिरणे, असे त्याचे उद्योग असत. निसर्गाचा सहवास शरदकुमाराला फार प्रिय होता. निरीक्षणशक्तीही दांडगी होती. 'श्रीकांत' मध्ये स्मशानभूमीचे व समुद्री वादळाचे जे यथातथ्य वर्णन आहे, ते शरच्चंद्रांच्या निरीक्षणाचे व साहसीवृत्तीचे फळच म्हणावे लागेल. त्यांच्यासंबंधी लिहिणारे दिलीपकुमार-रॉय यांनी दिलेली आठवण मार्मिक आहे. ते लिहितात, "एके दिवशी एका खेड्यात आम्ही दोघे फिरायला गेलो होतो. आमच्या गप्पा चालू असता ते एकाएकी एका वेली-समोर उभे राहिले. पूर्वी आपण ही कुठे पाहिली होती का, याचे स्मरण करीत राहिले. "कशाला आपल्या स्मरणशक्तीला एवढा ताण देऊन त्रास करून घेता ?" असे मी हसत हसत म्हणताच ते उत्तरले, "आपलं व्यक्तित्व माझ्यापासून लपवून ठेवणारी वस्तू जगात आहे तोपर्यंत मी त्रास करून घेणं कसं थांबेल ?"

या कुमार-वयात शरदबाबूंच्या जीवनात दोन व्यक्ती आल्या. त्यांपैकी एक बालिका होती. तिचे नाव धीरू. शरदबाबू तिला मारायचे पण तिच्यावर प्रेमही करायचे. ती पानफुलांच्या माळा करून त्यांच्या गळ्यात घालायची. पुढे ती त्यांच्या आयुष्यातून निघून गेली तरी हृदयात कायमचे घर करून राहिली. दुसरी व्यक्ती होती राजू मुजूमदार. याला शिकार, संगीत व अभिनयाची फार आवड होती. तो विलक्षण धाडसी होता. कोळ्यांच्या वस्तीतून मासे चोरून आणणारा हा बहाद्दर. पण गरिबांबद्दल तेवढाच कळवळा. अनाथांच्या शवाला अग्नी द्यायला, त्यांच्या औषधासाठी जोखीम पत्करायला घाबरत नसे. या दोन व्यक्तींचा ठसा शरच्चंद्रांच्या मनावर कायम कोरला गेला. याच राजूच्या मदतीने एका बहिष्कृत माणसाच्या प्रेताचे दहन केले म्हणून ब्राम्हणांनी भर पंक्तीत शरदबाबूंचा अपमान केला होता. बालपणी त्यांनी

ज्या घटना प्रत्यक्षात पाहिल्या त्यांचा सखोल प्रभाव त्यांच्या मनावर कायम राहिला अशा दोन घटना विशेष महत्त्वाच्या. नीरू नावाची एक विधवा गावच्या कुटुंबांची सेवा करायची व पवित्र जीवन जगायची. पण एकदा तिचे पाऊल घसरले. तिला वाळीत टाकण्यात आले. बिचारी असहाय स्थितीत दुःख सोशीत झिजून मेली. गावकऱ्यांनी तिचे प्रेत जाळायला नकार दिला. शेवटी डोंबांनी प्रेत गावाबाहेर नेऊन टाकले व कोल्ह्याकुत्र्यांनी फाडून खाल्ले ! असेच एका ओझाच्या मुलीनें एका कायस्थावर प्रेम केले. तो आजारी पडला तेव्हा आपल्या शुश्रूषेने त्याला मरणाच्या दाढेतून ओढून काढले. समाजाने कायस्थाला बहिष्कृत केले. या गोष्टी पाहून शरच्चंद्रांचे मन व्यथित झाले.

घरची आर्थिक स्थिती ओढगस्तीची असून, शरच्चंद्र स्वच्छंदी व उनाड असूनही जिद्दीने ते वयाच्या अठराव्या वर्षी मॅट्रिकची परीक्षा पास झाले. कॉलेजातही गेले. पण आईचा मृत्यू आणि वडिलांचे दारिद्र्य यांमुळे त्यांनी कॉलेजला रामराम ठोकून एका जमीनदाराकडे नोकरी धरली. तथापि, ती नोकरी फार दिवस टिकली नाही. कारण एक दिवस वडिलांनी हौसेने जमविलेले सुंदर शोभिवंत खडें शरदबाबूंनी गरजेपोटी विकून टाकले. वडील भडकले. शरच्चंद्र वडिलांशी भांडून घराबाहेर पडले.

सुमारे सहासात वर्षे त्यांनी अखखा भारत पायाखाली घातला. कधी संन्यासी बनून, तर कधी जिप्सी बनून. या भ्रमंतीत आजारी पडल्यावर अनोळखी माणसांनी मदतीचा हात पुढे केला. गोड गळा, मधुर वाणी, गोष्टी रंगवून सांगण्याचे कसब आणि गाणी म्हणण्याचे वेड यामुळे माणसे तरुण शरच्चंद्रांकडे आकर्षित होत. या भ्रमंतीत त्यांनी खूप अनुभव गोळा केले. खालच्या दर्जाच्या समाजात मिसळण्याचा प्रसंग आला तेव्हा त्यांच्यात शरदबाबूंना माणुसकीचा प्रत्यय आला. एका वेश्येने नशेत असलेल्या गिऱ्हाइकाचे तीन हजार रुपये नशा उतरल्यावर परत केलेले त्यांनी पाहिले. एका नर्तकीने या बिघडलेल्या मुलावर मोहिनी घालून त्याला भला माणूस बनवण्यासाठी प्रयत्न केले. या सर्व गोष्टींचा शरदबाबूंच्या संस्कारक्षम मनावर खूपच परिणाम झाला. अशा तऱ्हेने त्यांचे व्यक्तिमत्त्व घडत गेले. असे किती दिवस गेले असते कुणास ठाऊक ! पण इ. स. १९०३ साली. वडील वारले

आणि त्यांना घरी परतावे लागले.

वडिलांच्या मृत्यूनंतर थोरला मुलगा म्हणून घराची जबाबदारी त्यांच्या शिरावर पडली. भावंडांची कशीबशी सोय लावून नोकरीच्या शोधात ते कलकत्त्याला गेले. नोकऱ्या काय अशा रस्त्यावर पडलेल्या असतात ? काही दिवस त्यांनी एका वकिलाकडे बंगाली दस्तैवजांचे इंग्रजी भाषांतर करण्याचे काम पत्करले. याच काळात ' मंदिर ' नावाची कादंबरी लिहून एका मित्राच्या नावाने स्पर्धेसाठी पाठविली. तिला पहिले पारितोषिक मिळाले. तरीही उपजीविकेसाठी शरदबाबूंना वकिलाची नोकरी करीत राहावे लागले. शेवटी कंटाळून ब्रह्मदेशात वास्तव्याला असलेल्या मावशीच्या यजमानांकडे ते निघून गेले. रंगूनला पोचल्यावर काही दिवसांनी त्यांना ' पब्लिक वर्क्स अकौन्टस् ' खात्यात नोकरी मिळाली. ही नोकरी करीत असताना त्यांची मावशी कलकत्त्याला गेली आणि इकडे अघोरनाथ ( तिचे यजमान ) प्लेगने वारले. मावशी परत येण्याच्या सुमारास शरच्चंद्र घरातून परागंदा झाले.

पुन्हा एकदा शरच्चंद्रांच्या स्वच्छंदी जीवनाला सुरुवात झाली. ते मिस्त्री लोकांच्या बकाल वस्तीत राहू लागले. ही मंडळी व्यसनी असत. अफू खाणे, दारू पिणे आणि वेश्यागमन ह्या गोष्टी त्या समाजाला नेहमीच्या होत्या. त्यांची सेवा करतानाच त्यांच्यावर सोनेरी बेडीत अडकण्याचा प्रसंग आला. ते ज्या इमारतीत राहात त्याच इमारतीत वरच्या मजल्यावर यज्ञेश्वर नावाचा बंगाली मिस्त्री राहात असे, त्याला शांती नावाची मुलगी होती. तिचा विवाह यज्ञश्वराने एका व्यसनी वृद्धाशी ठरवला होता. कारण यज्ञेश्वरावर त्याचे कर्ज होते आणि ते फेडणे त्याला शक्य नव्हते. एके दिवशी शरदबाबू घरी आले तो शांती त्यांच्या अंधाऱ्या खोलीत लपून बसली होती. शरदबाबूंना तिने आपल्या दुर्दैवाची कहाणी ऐकविली. शरदबाबू यज्ञेश्वराला भेटले. मी कर्ज फिटवतो असे आश्वासन दिले. पण तो म्हणाला, ' तुम्ही मला कर्जातून मुक्त कराल पण मी मुलीचं लग्न कसं करू ? तुम्हाला एवढी कणव वाटते तर तुम्हीच हिच्याशी लग्न करा ना. ' हे आव्हानही त्यांनी स्वीकारले. आधी शांतीसाठी वर शोधण्याची खटपट केली. यश आले नाही तेव्हा स्वतःच तिच्याशी लग्न केले. हा भटका माणूस काही

काळ ‘ गृहस्थ ’ बनला. त्यांना एक मूलही झाले. पण प्लेगने दोघांही मायलेकरांचा बळी घेतला. पुन्हा शरदबाबू कलंदराचे जीवन जगू लागले.

पण फार काळ त्यांना हे सौख्य लाभले नाही. कृष्णदत्त अधिकारी नावाच्या एका गृहस्थाने आपल्या मोक्षदा नावाच्या मुलीला रंगूनला आणले होते. शरदबाबूंची लोकसेवेची वृत्ती आणि भोळा स्वभाव हेरून कृष्णदत्ताने सांगितले की तुम्ही मुलीचे लग्न करून द्या. नाहीतर तुम्हीच तिच्याशी लग्न करा. एवढेच नव्हे तर मुलीला या विधुराकडे सोडून बाप चक्क निघून गेला. शरच्चंद्राच्या व मोक्षदेच्या वयात खूप अंतर होते. दिसायलाही ती सामान्य होती. शरदबाबूंनी काही दिवस वरसंशोधन केले. यश आले नाही, शेवटी तेच तिच्याशी विवाहबद्ध झाले. या पत्नीचे नाव त्यांनी हिरण्मयी ठेवले. हिरण्यमयीने अत्यंत समर्पित भावनेने शरच्चंद्रांचा संसार सांभाळला. आमरण त्यांच्या जीवनाला स्वास्थ, स्थैर्य आणि शांती लाभली. मात्र हिरण्मयींना मूल झाले नाही. सुमारे चौदा वर्षे ब्रह्मदेशात घालवून ते हिरण्मयीदेवीबरोबर इ. स. १९१६ साली भारतात परत आले.

शरच्चंद्र कादंबरीकार कसे झाले हा इतिहास गंमतीचा व योगायोगाने भरलेला आहे. तशी कथालेखनाची ओढ त्यांना किशोर वयापासूनच होती. रंगूनला जाताना त्यांनी काही हस्तलिखिते आपल्या एका मित्राजवळ ठेवली होती. त्या मित्राजवळून ‘भारती’ मासिकाचे संपादक सौरींद्र मुखोपाध्याय यांनी ‘ बडी दीदी ’ ही कादंबरी नेली व शरच्चंद्रांची परवानगी न घेताच हप्त्यांनी ‘ भारती ’त प्रसिद्ध केली. इ. स. १९०७ साली ‘ बडी दीदी ’ चा पहिला हप्ता प्रसिद्ध झाला. तो वाचून लोक थक्क झाले. निनावी प्रसिद्ध झालेली ही कादंबरीची किस्त रवींद्रनाथांची असावी असे वाचकांना वाटले. रवींद्रनाथांनी ती कादंबरी वाचली तेव्हा त्यांनाही या नवोदित लेखकाच्या सामर्थ्याची जाणीव झाली. ही कादंबरी प्रसिद्ध झाल्याचे शरच्चंद्राना बरेच उशीरा कळले. या संबंधीची एक मनोज्ञ आठवण सौरींद्रांनी दिली आहे. ‘ बडी दीदी ’ प्रसिद्ध झाल्यावर तब्बल साडेपाच वर्षांनी शरच्चंद्रांना ती ऐकवण्यात आली तेव्हाचा हा प्रसंग आहे. शौरींद्रबाबू लिहितात—

‘ भारती ’च्या बांधलेल्या अंकातून मी कादंबरी वाचू लागलो. शरच्चंद्र

पडून ती ऐकत होते. मध्येच उठून त्यांनी माझा हात दाबून जोरात म्हटले, " थांबा ! "

त्यांचा कंठ दाटून आला होता. डोळयांत अश्रू जमले होते. थोडे थांबून ते आश्चर्याने म्हणाले, " ही माझी रचना आहे ?" जणू ही आपणच लिहिली यावर त्यांचा विश्वास बसत नव्हता.

मग आम्ही त्यांना झिडकारून म्हटले, " तुम्ही लेखन सोडून केवढा अपराध केला आहे याचा थोडा विचार करा. "

शरच्चंद्र बराच वेळ उदासपणे गप्प राहिले. मग म्हणाले, " बरं लिहीन ! खरंच लेखन सोडून मी काही बरं केलं नाही. रचना चांगली आहे. माझं हृदय हेलावून गेली ! "

त्यानंतर शरच्चंद्रांनी लेखन सुरू केले. इ. स. १९१६ साली ते भारतात आले त्या वेळी त्यांची ' मेजो दीदी ' ( मंझली दीदी ), ' पल्ली समाज ' ( ग्रामीण समाज ), ' चंद्रनाथ ' आणि ' शुभदा ' ही पुस्तके प्रकाशित झाली होती. त्यांच्या कादंबऱ्यांना खूप मागणी येऊ लागली होती. बऱ्यापैकी पैसाही मिळू लागला होता. मित्रांच्या आग्रहावरूनच आणि निश्चित प्राप्तीची खात्री झाल्यावरच ते कलकत्त्याला परत आले. तेव्हा त्यांचे उत्साहाने स्वागत करण्यात आले. यापुढे त्यांच्या जीवनाला स्थैर्य आले.

आता शरदबाबू पूर्णपणे गृहस्थाश्रमी बनले. त्यांनी कलकत्त्याला घर बांधले. मोटार विकत घेतली, राहणीत श्रीमंती थाट आला. बाह्यवेष बदलला. उत्तम कपडे, सोनेरी काड्यांचा चष्मा, काळा पंपशू, चांदीच्या मुठीची काठी, किमती लेखण्या असा श्रीमंती बडेजाव आला. मित्रपरिवार वाढला. गप्पांच्या मैफली झडू लागल्या. भाऊ बहीण त्यांच्याकडे येऊन राहू लागले, सातत्याने लेखन होऊ लागले. महिना हजार बाराशे रुपये मिळू लागले. गावी जाताना ते मिठाईच्या टोपल्या नेऊ लागले. गोरगरिबांच्या मुलांच्या शिक्षणासाठी मदतही करू लागले. एका मित्राच्या अडचणीच्या वेळी त्यांनी ' काशीनाथ ' कादंबरीचे सर्व हक्क त्याला देऊन टाकले. धनसंचय करण्याची कल्पनाच कधी त्यांच्या मनाला शिवली नाही. असा हा उदार व माणुसकीने परिपूर्ण लेखक होता !

देशबंधू चित्तरंजन दास हे ' नारायण ' नावाचे मासिक चालवीत.

त्यासाठी कथा लिहिण्याची त्यांनी शरदबाबूंना विनंती केली. त्यांची कथा वाचून देशबंधू इतके प्रभावित झाले की त्यांनी कोरा चेक पाठवून शरच्चंद्रांनाच आकडा टाकून घेण्यासाठी लिहिले. पण त्यावर शरच्चंद्रांनी केवळ १०० चा आकडा टाकला ! अशीच दुसरी घटना शरच्चंद्रांच्या लेखनाच्या श्रेष्ठतेची साक्ष पटविणारी आहे. सर आशुतोष मुखर्जी कलकत्ता विद्यापीठाचे कुलगुरू असताना त्यांचे एक स्नेही शरच्चंद्रांची 'बिंदूचे बाळ' ( बिंदूर छेले ) ही कादंबरी घेऊन गेले आणि त्यांनी सरसाहेबांना ती वाचून पाहण्याची विनंती केली. प्रथम त्यांनी ती विनंती धुडकावून लावली. पण आग्रहाला बळी पडून शेवटी ती वाचली. आणि काय आश्चर्य ! वाचून संपताच त्यांनी एक कागद ओढून त्यावर 'हे पुस्तक मॅट्रिकच्या अभ्यासक्रमात नेमावे' अशी शिफारस विद्यापीठाकडे पाठविली. यावरून शरच्चंद्रांच्या वाङ्मयाचा प्रभाव सुशिक्षित वाचकांवरही किती पडत असे याची कल्पना येते, नव्हे, बुद्धिमानवर्गसुद्धा त्यांच्या साहित्याने कसा प्रभावित होत असेल हे ध्यानात येते. म्हणूनच तर शरच्चंद्रांच्या अनुवादित कादंबऱ्यांनी महाराष्ट्रीय वाचक भारावून गेले.

शरच्चंद्रांना केवळ बासष्ट वर्षांचे आयुष्य लाभले. आपल्या हयातीत त्यांनी ३५ कादंबऱ्या व दीर्घकथा लिहिल्या, मराठीत 'सव्यसाची' या शीर्षकाने प्रसिद्ध झालेली 'पथेरदाबी' ही एकमेव राजकीय कादंबरी सोडल्यास त्यांच्या सर्व कादंबऱ्या सामाजिक आहेत. शरच्चंद्र रंगूनवरून भारतात परत आले तो काळ राजकीय धामधुमीचा होता. शरदबाबू फार काळ अलिप्त राहू शकले नाहीत. इ. स. १९२२ साली ते हावरा काँग्रेस कमेटीचे अध्यक्ष होते. देशबंधू दास आणि नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्याशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते. क्रांतिकारकांनाही त्यांनी मदत केली. इ. स. १९३० च्या चळवळीतही त्यांनी सक्रीय भाग घेतला होता. गांधीजींबद्दल त्यांना आदर होता. हृदयात जाज्वल्य देशाभिमान होता. एकदा त्यांच्या एका साहित्यिक मित्राने म्हटले, "आपण साहित्यिक आहोत. साहित्यचर्चा करणे हे आपले काम. राजकारण करणे आपले काम नव्हे." त्यावर शरच्चंद्र त्वेषाने उद्गारले "ही तुमची भयंकर चूक आहे. राजकारणात सहकार्य करणे हे सर्व देशवासीयांचे कर्तव्य आहे. आमच्या

देशातील हे राजकीय आंदोलन खऱ्या अर्थाने स्वातंत्र्याचे आंदोलन आहे. अशा चळवळीत साहित्यिकांनी विशेष पुढाकार घेतला पाहिजे. लोकमत जागृत करण्याचे पुण्यकार्य जगातील सर्व साहित्यिकांनी केले आहे. युगानुयुगे त्यांनीच मानवी मनात स्वातंत्र्याची आशा, आकांक्षा तेवत ठेवली आहे." या उद्‌गारांवरूनही त्यांचा दृष्टिकोन स्पष्ट होतो. रवींद्रनाथांचे गांधीजींशी असलेले मतभेद शरच्चंद्रांना कधीच रुचले नाहीत. त्यांनी रवींद्रनाथांशी वैचारिक चकमकही केली.

नाही तरी शरच्चंद्रांचे आचार-विचार क्रांतिकारीच होते. तत्कालीन पांढरपेशा बंगाली समाजाला त्यांचे आचार-विचार कधीच पटले नाहीत. त्यांचा भटकेपणा, दलितांविषयी कळवळा, पतितांबद्दल त्यांना वाटणारा जिव्हाळा आणि प्रसंगी त्यांना चाकोरी सोडून केलेली मदत, या गोष्टी त्या काळी शिष्ट समाजाला मानवणाऱ्या नव्हत्या. त्यांचा दृष्टिकोनही अप्रियच होता.

शरच्चंद्र दिसायला निस्तेज, मध्यम उंचीचे, किरकोळ बांध्याचे होते. भव्य कपाळ आणि चमकदार डोळे सोडल्यास त्यांचे व्यक्तिमत्त्व आकर्षक नव्हते. त्यातून ते विलक्षण संकोची स्वभावाचे होते. गर्दीला ते बिचकत. सभेत बोलताना घाबरत. बहुधा आपले भाषण लिहून नेत. समयस्फूर्त बोलण्याची पाळी आलीच तर तीन-चार मिनिटांपेक्षा अधिक वेळ बोलत नसत. लेखक म्हणून गाजल्यानंतरही त्यांचा प्रसिद्धीचा संकोच कमी झाला नाही. स्वतः-बद्दल त्यांनी काहीच लिहून ठेवले नाही. त्यामुळे त्यांच्या जीवनाचे गूढ अद्यापही पूर्णपणे उकलले नाही.

शरच्चंद्रांना लेखनाइतकेच वाचनाचेही वेड होते. ब्रम्हदेशात असताना त्यांची मित्रा नावाच्या ग्रहस्थाशी ओळख झाली. त्यांच्या खाजगी ग्रंथसंभारातून शरदबाबूंनी मिल, स्पेन्सर, कान्ट, हेगेल वाचून काढले. टॉलस्टॉय, डोस्टोव्हस्की, गॉर्की हे कादंबरीकार त्यांच्या आवडीचे होते. 'अॅना कॅरेनिना' ही कादंबरी त्यांनी पन्नास वेळा वाचल्याचे सांगतात. टागोरांची 'गोरा' चौसष्ट वेळा वाचल्याचे त्यांनी स्वतःच सांगितले आहे. ललित वाङमयाबरोबरच तत्त्वज्ञानाचा तर त्यांनी अभ्यास केलाच. पण इतिहास व समाजशास्त्राचाही अभ्यास केला. मृत्यूच्या पूर्वी बरेच

दिवस ते आजारी होते: त्या वेळी त्यांच्या भेटीला गेलेल्या बॅ. युसुफ मेहेरअलींनी त्यांना विचारले, "तुम्हांला कोणती पुस्तके वाचायला आवडतात ?" त्यावर शरच्चंद्र म्हणाले, "हल्ली माझं वाचन कमी झालं आहे. आता जी थोडी पुस्तकं मला वाचायला आवडतात ती विज्ञानाची.'

शरच्चंद्रांना अफूचे व्यसन होते. ते कसे व केव्हा लागले हे कळत नाही. त्यांना सतत हुक्का लागे. लिहिताना क्षणभर हुक्क्याशिवाय चालत नसे. शिवाय दिवसभर चहा चालूच असे. चहा त्यांना अति प्रिय होता आणि एकाच वेळी ते एकाहून अधिक कप चहा पीत. ते एका विशिष्ट आराम खुर्चीत बसून वाचन व लेखन करीत. लेखनासाठी भारी कागद वापरीत. अर्थात् लेखक म्हणून प्रसिद्धी पावल्यावर व लेखनावर उपजीविका सुरू केल्यावर. त्यांची झरणी (फाऊंटनपेन) जाड असे मात्र नीब बारीक लागे. त्यांचे अक्षर वळणदार व सुबक होते. शरच्चंद्रांना आणखी एक नाद होता. पाळीव प्राणी बाळगल्याचा नाद तर बालपणापासूनच होता. पण ब्रह्मदेशात वास्तव्याला असतानाच बहुधा त्यांनी होमिओ पॅथीचा शास्त्रशुद्ध अभ्यास केला. गरिबांना ते स्वखर्चाने होमिओपॅथिक औषधे वाटीत.

शरच्चंद्र तसे भाग्यवानच म्हटले पाहिजेत. त्यांच्या हयातीतच बंगालने त्यांचा गौरव केला. प्रथम कलकत्ता विद्यापीठाने त्यांच्या साहित्यसेवेप्रीत्यर्थ इ. स. १९२३ साली 'जगत्तारिणी सुवर्ण पदक' देऊन त्यांचा गौरव केला. इ. स. १९३४ साली वंगीय साहित्य सभेचे सन्मान्य सदस्यत्व त्यांना बहाल करण्यात आले. इ.स. १९३६ साली म्हणजे त्यांच्या षष्ठ्यब्दीनिमित्त ढाका विद्यापीठाने त्यांना सन्मान्य डॉ. लिट्. उपाधी देऊन त्यांचा गौरव केला. पण या सर्वांहून अधिक गौरव झाला तो त्यांच्या सत्तावन्नाव्या वाढदिवशी. अखिल बंगालच्या महिला संस्थांनी कलकत्त्याच्या टाउन हॉलमध्ये जे मानपत्र प्रदान केले त्याने झाला. हा गौरव अनन्य व अपूर्व होता. त्यासंबंधी श्री. मन्मथनाथ गुप्त लिहितात, "देशातील स्त्रीवर्गाने शरच्चंद्रांचे ज्या शब्दांत अभिनंदन केले तशा शब्दात प्रशंसा अन्य कोणत्याही लेखकाच्या वाट्याला आली नाही,"

शरच्चंद्रांचे जीवन, व्यक्तिमत्त्व आणि कार्य अशा प्रकारचे होते. दि. १६ जानेवारी १९३८ रोजी सकाळी दहा वाजता कलकत्त्याच्या पार्क नर्सिंग होममध्ये वयाच्या बासष्टाव्या वर्षी त्यांचे निधन झाले. एक कलंदर कलावंत अनंतात विलीन झाला !

□ □ □

□

# दोन

## माणुसकीचा शोध घेणारा कादंबरीकार

विसाव्या शतकात नि विशेषतः पहिल्या व दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक कादंबरीचे स्वरूप अंतर्बाह्य बदलले, तिच्या बदलत्या स्वरूपाचे अनुकरण व अनुसरण भारतातही सुरू झाले. नवा सुशिक्षित पांढरपेशा वाचकवर्ग उत्तरोत्तर चोखंदळ बनत आहे. डी. एच्. जेम्स जॉइस, ऑलबर्ट काम् आदी पाश्चात्त्यांच्या कादंबऱ्यांनी भारावलेला हा नवा वाचक जुन्या भारतीय कादंबरीकारांना तुच्छ लेखू लागला आहे. तरीही शरच्चंद्रांच्या कादंबऱ्यांचे आकर्षण कमी झालेले नाही. कोणताही नवा वाद, नवीन लेखन–प्रयोग किंवा तथाकथित नवा जीवनविषयक, सामाजिक किंवा राजकीय दृष्टिकोन न स्वीकारता केवळ मानवी जीवनाचा व मनाचा वेध घेऊन शरच्चंद्रांनी वाचकांना सदैव प्रभावित केले आहे.

माणूस आणि त्याच्यातील माणुसकी हा शरच्चंद्रांच्या कथा-कादंबऱ्यांचा केंद्रबिंदू आहे. माणसाकडे पाहण्याच्या सहृदय दृष्टीत शरच्चंद्रांचे वैशिष्टय दडलेले आहे. ते म्हणतात, " माणसाच्या अंतर्मनात दडलेली माणुसकी, सर्वजण पाहू शकतातच असे नाही; त्या नाना प्रकारात

व्यक्त होणाऱ्या माणुसकीला मी सर्वदा आपणासमोर सादर केले आहे." म्हणूनच त्यांच्या कादंबऱ्यांतून रूढ अर्थाने खलपुरुष अगर खलस्त्री शोधून सापडत नाहीत. कोणतीही व्यक्ती पूर्णपणे चांगली किंवा वाईट असत नाही, हे तत्त्व फ्राइडच्या मनोवगाहन शास्त्रात मान्य करण्यात आले आहे. फ्राइडच्या या मानसशास्त्रीय कसोटीला शरदबाबूंची पात्रे पुरेपूर उतरतात हे खरोखरीच आश्चर्यजनक आहे. वास्तविक आपल्या धकाधकीच्या श्रमंतीपूर्ण जीवनात नवमानसशास्त्राचा परिचय घेण्याइतकी उसंत अगर उत्साह त्यांच्याजवळ असेलसे वाटत नाही. मग त्यांच्या कादंबऱ्या कसोटीला उतरतात त्या कशा ? केवळ मानवी अंतःकरणाचा, माणसातील माणुसकीचा सोध घेण्याच्या प्रवृत्तीतून त्यांनी हे साध्य केले आहे. ह्या माणुसकीच्या शोधातूनच त्यांना अविस्मरणीय व्यक्ती गवसल्या. श्रीकांत, देवदास, विप्रदास आदी पुरुष आणि अभया; राजलक्ष्मी, सावित्री, चंद्रमुखी आदी स्त्रिया वाचकांवर आपली छाप पाडून जातात.

लेखकाची अलिप्तता हा ललित साहित्यात फार मोठा गुण मानला जातो. आपण अलिप्तपणे लिहितो असे शरच्चंद्रांच्या श्रीकांत, देवदास, चरित्रहीन किंवा शेषप्रश्न या कादंबऱ्या वाचताना, ज्यांना शरदबाबूंचे चरित्र माहीत आहे त्यांना आपण शरच्चंद्रांची जीवनकथाच वाचतो आहोत असा भास होतो. या कादंबऱ्या आत्मपर असाव्यात अशी दाट शंका येऊ लागते. शरच्चंद्रांचे एक अभ्यासक श्री. मन्मथनाथ गुप्त याला दुजोरा देतात. ते म्हणतात, " देवदास "च्या पूर्वार्धात शरच्चंद्रांनी स्वतःचे जीवन लिहिले आहे." धीरू नावाची त्यांची बालमैत्रीण शरच्चंद्रांच्या कादंबऱ्यात पुन्हा पुन्हा येते. ' देवदास 'मधील पार्वती किंवा ' श्रीकांत 'मधील राजलक्ष्मी ह्या त्याच मुलीच्या प्रतिमा आहेत असेही ते सांगतात. त्यांचा बालमित्र राजेंद्र म्हणजेच ' श्रीकांत 'मधील इंद्रनाथ होय आणि त्यांचा दुसरा मित्र सदानंद त्यांच्या ' शुभदा 'त दिसतो. अशी कितीतरी उदाहरणे त्यांनी दिली आहेत. यातील सत्य व तथ्य शोधून काढणे हा संशोधनाचा विषय ठरेल. मात्र कोणताही लेखक आपल्या साहित्यात अप्रत्यक्षपणे वावरत असतो हे काही खोटे नाही, नाही तरी कादंबरीतील पुरुष हे लेखकाचे मानसपुत्र असतात तर स्त्रिया त्याच्याच मानसकन्या असतात. त्यांच्या

संकल्पनापासून प्रत्यक्ष चित्रणापर्यंत लेखकाची कल्पनाशक्ती व प्रतिभा कार्यक्षम असते. साहजिकच त्याचे जीवन, जीवनानुभव, त्याने पाहिलेल्या व्यक्ती यांचा परिपोष अप्रत्यक्षपणे वाङ्मयातून झाल्याशिवाय कसा राहील? तर मग तो अलिप्त कसा ?

या प्रश्नाचे उत्तर असे की लेखकाच्या द्रार्शनिक संकल्पनात जरी एखादी जिवंत व्यक्ती असली तरी एकदा तिला कथेत प्रवेश दिला की मग लेखक तिला तिच्या स्वभावधर्मानुसार व परिस्थितीनुसार वागण्याचे स्वातंत्र्य देतो. त्यांना आपल्या हातातील बाहुली बनवीत नाही. शरच्चंद्र नेमके हेच करतात. ते म्हणतात, :' मी घटनांना कादंबरीची अस्सल वस्तू मानीत नाही. माझा एकमेव उद्देश व्यक्तिचित्रण हा असतो. " अर्थात् व्यक्तिदर्शन घडवताना ते व्यक्तीच्या अंतर्मनाचा वेध घेतात. त्या व्यक्तीच्या कृतीमागील प्रेरणा हेरतात, तिच्या ठिकाणची उदात्तता पाहतात. ही उत्तुंग उदात्तता भारतीय संस्कृतीमधील जीवनमूल्यांनी आलेली दिसते. धर्म, रूढी व परंपरा यातून ती दृढमूल झालेली असते. याचा 'अर्थ असाही नव्हे की सर्वच रुढी व परंपरा पालनयोग्य आहेत. तसे पाहिले तर तर शरच्चंद्र हे स्वतःच रूढिभंजक व परंपरेला मूठमाती देणारे सुधारक म्हणा किंवा क्रांतिकारक होते. परंतु त्याबद्दल त्यांच्याठिकाणी अहंकार किंवा हट्ट नव्हता. आपली मते अगर विचार ते आपल्या पात्रांवर लादीत नाहीत. त्यांच्या बंडखोरीचे समर्थन करीत नाहीत की खंडनही करीत नाहीत.

शरच्चंद्रांच्या कादंबऱ्यांचे एक वैशिष्टय म्हणजे त्यांचे भारतीयत्व. हे भारतीयत्व त्यांना ग्रामीण संस्कृतीत गवसले. ग्रामीण जीवन व संस्कृती नागरी जीवनापेक्षा व संस्कृतीपेक्षा वेगळी असते. ग्रामीण जीवनात जिव्हाळा असतो, माणुसकी दिसते. ही खेडवळ अशिक्षित माणसे काही सनातन जीवनमूल्यांना प्राणाहून अधिक जपतात. शरच्चंद्रांच्या काळी हे ग्रामीण जीवन शांत व संथ होते. ह्या ग्रामीण जीवनातील कौटुंबिक संघर्षाच्या व तडजोडीच्या कथा शरच्चंद्रांनी लिहिल्या. शरदबाबूंच्या साहित्यसृष्टीतील व्यक्ती अतिसामान्य, पुष्कळदा उपेक्षित व दरिद्री असल्या तरी त्यांच्या हृदयातील माणुसकी जागी असते. शरदबाबू जेव्हा त्या माणुसकीचे दर्शन

घडवतात तेव्हा वाचक दिपून जातो. याला एक कारण हेही असू शकेल की, या माणुसकीचा त्यांना जीवनात अनेकवार प्रत्यय आला. ऐन तारुण्यात संन्याशी बनून भ्रमण करीत असताना त्यांना आश्रय देणाऱ्या, आजारात सेवाशुश्रुषा करणाऱ्या अनोळखी व्यक्ती त्यांना भेटल्या. समाजाने पतित ठरविलेल्या उपेक्षितांनी त्यांचे कल्याण साधण्यासाठी खटपट केली. हे सर्व पाहून त्यांचा दृष्टिकोन न बदलता तरच नवल !

जीवन हे गूढ आहे याची शरच्चंद्र वारंवार आठवण करून देतात. मानवी जीवनाची गूढता त्यांनी समर्थपणे रंगवली आहे. मात्र गूढतेची उकल करण्याचा ते प्रयत्न करीत नाहीत. जीवनात पाप-पुण्य, नीति-अनीती यांच्या सीमारेषा कधीच स्पष्ट नसतात. किंबहुना, त्या परस्परांत मिसळून जातात हे त्यांना स्वानुभवाने पटले होते. विशेषत: शरदबाबूंच्या सूक्ष्म दृष्टीने समाजाच्या तळाशी दबलेल्या, गुदमरत पडलेल्या व्यक्तींचा वेध घेतला तेव्हाच त्यांना याचा प्रत्यय आला. मध्यम वर्गीय आणि सधन लोकांतही त्यांना हेच आढळले. कारण मानवी मन इथून तिथून सारखेच नसते का ? स्वत:ला सुसंस्कृत समजणाऱ्या समाजातील व्यक्ती आपल्या मनाचा कोंडमारा करून घेतात एवढेच. वास्तविक अर्थप्राप्ती व कामतृप्ती ह्याच मानवी जीवनातील मुलभूत प्रेरणा होत. अर्थस्य दास: पुरुष: ' असे शास्त्रकारही सांगतात. तरी शरदबाबूंच्या कादंबऱ्यांतील पात्रे अर्थप्राप्ती विषयी उदासीन दिसतात. ही सुद्धा तत्कालीन बंगाली जीवनातील गूढताच म्हणावी लागेल. परंतू तत्कालीन ग्रामीण क्षेत्रात वावरणारी श्रीमंत व गरीब माणसे अर्थप्राप्तीला फार महत्त्व देताना दिसत नव्हती. म्हणूनच त्यासाठी संघर्षही आढळत नाही. मात्र प्रेमासाठी हीच माणसे चाकोरी सोडायला भीत नाहीत. शरच्चंद्रांच्या मानसकन्या उत्कटनेने प्रेम करतात. प्रेमासाठी त्याग करतात. पण प्रणयातुर दिसत नाहीत. आत्मिक प्रेमालाच ती महत्त्व देतात. अशी ही माणसे (स्त्री–पुरुष) गुढ वाटावीत, अनाकलनीय वाटावीत यात आश्चर्य नाही.

आपण साहित्यिक आहोत, समाजधुरीण नाही ही गोष्ट शरच्चंद्रांनी कधीही नजरेआड होऊ दिलेली दिसत नाही. ते म्हणत, "हिंदु समाज स्वर्गात जातो की नरकात ह्याविषयी चिंता करण्याचा भार काही माझ्यावर नाही."

मात्र "मी अनीतीचा प्रचार करण्यासाठी हातात लेखणी धरली नाही" असेही ते बोलत. शरच्चंद्रांच्या कादंबऱ्यांमधून व्यक्तींचे जे उन्नयन दृष्टीस पडते त्या मागील भूमिका ही असली तरी रूढीचा विरोध त्याच्या समाजाभिमुख भूमिकेतूनच उत्पन्न झाला हे विसरता कामा येत नाही. म्हणूनच रूढ नीतिअनीतीच्या, पापपुण्याच्या कल्पनांना धक्के देताना शरदबाबू मुळीच कचरत नाहीत. असे असले तरी त्यांची पात्रे रूढ नीतिविरुद्ध वागूनही त्यांच्याविषयी घृणा वाटत नाही. वाटते ती करुणा व सहानुभूती. कारण समाजधारणेनुसार पापाच्या गर्तेत उतरणाऱ्या व्यक्ती आपल्या कृतकर्माची कौटुंबिक अगर सामजिक परिणती मानून बंडखोरपणे रूढ नैतिकतेला विरोध दर्शवितात. पुष्कळदा त्यांच्या समाजनीतिविरोधी कृत्यात व्यक्तिगत वासनेहून अधिक उदात्त विचार अभिप्रेत असतो. भोगाच्या जोडीला त्यागही असतो. नेमका तो त्या व्यक्तीचे उन्नयन घडवून आणीत असतो, आणि हे सर्व करण्यामागील हेतू स्खलनशील व्यक्तीच्या अंतरंगात दडून बसलेल्या माणुसकीचे दर्शन घडवणे हाच असतो. हे सर्व ते अत्यंत शांतपणे, भावनेच्या आहारी न जाता अत्यंत अलिप्तपणे करीत असतात.

माणसाच्या अंतर्मनाचा वेध घेण्याच्या उत्कट तळमळीमुळेच शरच्चंद्रांची पात्रे रंगरूपहीन चित्रिलेली दिसतात, शरदबाबूंच्या कादंबऱ्यांतील स्त्रीपुरुषांच्या आकृती वाचकांच्या स्मरणात राहतात त्याच मुळी आपल्या असाधारण व्यक्तिमत्त्वामुळे. त्यांच्या अस्तित्वाची जाणीव प्रभावी असली तरी मूर्ती अस्पष्ट व धूसरच राहतात. शरच्चंद्रांच्या व्यक्तिदर्शनात बाह्य सौंदर्याला, रेखीवपणाला वावच नाही. राजलक्ष्मी किंवा किरणमयी लावण्यवती होत्या हे कळूनही त्यांच्या आकृती तरलच राहतात. श्रीकांत किंवा उपेंद्र मनात घर करून जातात पण चक्षूपुढे उभे राहात नाहीत. केवळ माणुसकीचा शोध घेण्याच्या जिज्ञासेपोटीच ते आपल्या अशरिरी व्यक्तींना संस्मरणीय बनवू शकले.

शरच्चंद्रांच्या कादंबरीचा विचार त्यांच्या स्त्रीसृष्टीच्या विचाराशिवाय अपुरा ठरतो. 'शरदके नारीपात्र' या ग्रंथात रामस्वरूप चतुर्वेदी लिहितात, 'भारतीय स्त्रीची दुर्दशा हीच शरदबाबूंच्या कलेची मूळ प्रेरणा होय. बंगाली स्त्री शरदबाबूंना कशी दिसली? खरी भारतीय

स्त्री भासली. रवींद्रनाथांच्या मते ' स्त्री ही एक तर ' प्रिया असते किंवा माता असते. ' शरदबाबूंना ही प्रिया व माता दिसलीच पण त्याहून अधिक काही दिसली. तिची विविध रूपे शरच्चंद्रांनी आपल्या साहित्यसृष्टीत व्यक्त केली आहेत. हे वैशिष्टय पाहून कोणीही थक्क झाल्याशिवाय राहणार नाही. सच्छील गृहिणी हे स्त्रीचे सर्वसामान्य रूप. त्या स्वरूपातसुद्धा तिच्या व्यक्तिमत्त्वाचे कितीतरी पैलू पाहायला मिळतात. नेमके हेच इतर कादंबरीकार करतात. याउलट प्रेयसी, माता आणि भगिनी ह्या रूपांखेरीज विधवा, परित्यक्ता आणि पतिता ह्या रूपांचे वैविध्यही. शरदबाबू चित्रित करतात. स्त्रीच्या अंतरंगाचा वेध घेण्यात शरच्चंद्रांची बरोबरी करणारा अन्य कादंबरीकार शोधून सापडणार नाही.

शरच्चंद्रांच्या काही मानसकन्या शिक्षित असल्या तरी बहुसंख्य अशिक्षित आहेत. काही बंडखोर असल्या तरी बहुतेक प्रवाहपतित आहेत. मात्र बहुतेक सर्वच आपली भक्ती, प्रेम किंवा वात्सल्य यांनी वाचकांच्या आदराला पात्र ठरतात. वाचक सर्वांत अधिक जर कशाने प्रभावित होत असेल तर शरदबाबूंच्या या मानसकन्यांची सहनशीलता, त्यागाची परिसीमा पाहून होतो. बहुधा यामुळेच एका व्यक्तीने शरदबाबूंना म्हटले, " आपण स्वतः काहीही म्हणा, पण सनातन धर्माला धक्का लावण्याची आपली इच्छा दिसत नाही असे आपल्या वाङ्मयकृती वाचून माझे मत झाले आहे. ' चरित्रहीन या कादंबरीतील किरणमयीने दिवाकर बरोबर आगबोटीतल्या खोलीत एका बिछान्यावर झोपूनही अपले शील नष्ट होऊ दिले नाही. हे पाहिल्यावर आपण सनातन धर्म मानीत नाही असे आम्हाला कसे म्हणता येईल ?" यावर शरदबाबू म्हणाले, " आपण म्हणालात तसे काहीही मी करीत नाही. किरणमयीने स्वतःचे शील नष्ट केले असते तरी माझ काही नुकसान झाले नसते. पण त्यामुळे पा एकदम असत्य झाले असते."याचा अर्थच असा की आपण जे स्वभावदर्शन घडवतो ते अस्वाभाविक अगर असत्य होऊ नये यासाठी शरदबाबू जपत. फक्त त्यांनी आपल्या साहित्यसृष्टीत मानवी भावनांची व त्या प्रकट करणाऱ्या व्यक्तींची योग्य

अशी निवड केली. ' रामेर सुमति ' मधील धाकट्या दिरावर पुत्रवत् अकृत्रिम प्रेम करणारी नारायणी, ' बिंदूर छेले ' मधील जावेच्या मुलावर स्वतःच्या मुलाप्रमाणे वात्सल्याचा वर्षाव करणारी बिंदू ' मेजदीदी ' मधील जावेच्या धाकट्या भावावर मायेचा वर्षाव करणारी हेमांगिनी, ह्या सर्व स्त्रिया केवळ मातृहृदयी नव्हेत तर माणुसकीने भारावलेल्या आहेत, आणि वाचकांनाही त्या भारावून टाकतात.

कलंदर वृत्तीचा हा कलावंत बंडखोर असावा यात नवल नाही. त्याची ही बंडखोरी पुरुष–पात्रांच्या नव्हे तर स्त्री पात्रांच्या व्यक्तिदर्शनातून स्पष्टपणे दिसून येते. ' चरित्रहीन ' मधील किरणमयी, ' गृहदाह ' मधील अचला, ' शेष प्रश्न ' मधील कमला या अशाच बंडखोर स्त्रिया आहेत. किरणमयी तशी का बनते ? प्रेमाच्या भुकेल्या या स्त्रीच्या वाट्याला प्रेम-शून्यातच येते म्हणून. प्रेमापायी ती समाजाची पर्वा करीत नाही. अचला मानसिक संघर्षात होरपळते. तिच्या स्वभावातील विरोधाभास शरदबाबू कुशलतेने चित्रित करतात. कमला तर अगदीच वेगळी आहे. आपल्या कलंकित जन्मकथेबद्दल, आपल्या पतीशी फारकत घेण्याबद्दल आणि आपल्या आवडत्या व्यक्तीजवळ राहण्याबद्दल तिला यत्किंचितही कमीपणा अगर खंत वाटत नाही. ' जलद गतीने जाण्यात मोठा आनंद आहे.' असे ती म्हणते व ही गतिमानता तिच्या जीवनात दृग्गोचर होते. पण या बंडखोर स्त्रिया-देखील वाचकाला आकृष्ट करतात. कारण त्याही काही जीवनमूल्यांना मानतात.

' राजलक्ष्मी ' (श्रीकांत), चंद्रमुखी (देवदास) किंवा षोडशी (देना–पावना) या तर जाणून पतिता. वेश्या किंवा देवदासी असल्या तरी त्यांच्या ठिकाणी जो एकनिष्ठतेचा, उत्कट प्रेमाचा व त्यासाठी त्यागाचा शरच्चंद्र वाचकांना जो प्रत्यय आणून देतात तो अविस्मरणीय तसाच उदात्त आहे. याबद्दल त्यांना जेव्हा एकाने प्रश्न केला की, ' आपण जर वेश्येमध्ये काही सद्‌गुण आहेत असे दाखवलेत तर लोकांच्या दृष्टीने वेश्येचे दोष कमी करण्यासारखेच ते होणार नाही काय ?' यावर शरच्चंद्रांनी दिलेले उत्तर मार्मिक आहे. ते बोलले, ' होईलही. परंतु त्यात हानी कसली आहे ? जे खरे आहे ते मी का लिहू नये ?' याचा सरळ अर्थ असा की रुढी व परंपरा

मान्य करण्याऐवजी जो वेगळा अनुभव त्यांना मिळाला त्याचा पाठपुरावा करायला ते कचरले नाहीत, हाच त्यांचा मोठेपणा. केवळ समाजाची भीड बाळगून त्यांनी पतितांचे चित्रण केले नाही. त्यांना जेव्हा विचारण्यात आले की, 'तुम्ही निर्माण केलेल्या स्त्रीपात्रांमधून सतित्वाच्या प्राचीन मनोधारणांविरुद्ध तुम्ही एक ' रिवोल्ट ' उभा केला का ?' तेव्हा त्यांनी चक्क नकार दिला. फक्त ते एवढेच बोलले की पुरुषांसाठी सर्व वाटा मोकळ्या असल्या तरी स्त्रियांवर फार नियंत्रणे आहेत. त्यांचा पाय घसरला तर त्यांना पुन्हा समाजात आपले स्थान प्राप्त करून घेता येत नाही. याविरुद्ध त्यांनी आवाज उठवला. पण कलेला प्रचाराची अवकळा येऊ दिली नाही. आपला मानवाकडे पाहण्याचा दृष्टिकोन सांगताना ते म्हणतात, ' मी मनुष्याला मोठा करून स्वीकारतो. त्याला लहान करून मी ' त्याला स्वीकारू शकत नाही.' बहुधा यामुळेच शरच्चंद्रांच्या कादंबऱ्यांतील स्त्रीजीवन हे उदात्ततेने परिपूर्ण आहे. त्यांनी पतितांकडेही पाहिले. ते माणूस म्हणून. यासंबंधांत ' आवारा मासिका'चे लेखक श्री. विष्णु प्रभाकर यांचे उद्‌गार मार्मिक आहेत. ते म्हणतात, ' अबोल स्त्रीच्या दुःखाला वाचा फोडणे आणि पतिता स्त्रीच्या हृदयात लपून राहिलेल्या मानवाचा शोध करणे, यात शरद-साहित्याच्या मोठेपणाचे बीज आहे ?

□ □ □

□

तीन

# कादंबऱ्यांतील व्यक्तिदर्शन

शरच्चंद्रांनी दीर्घकथा व कादंबऱ्या मिळून सुमारे पस्तीस साहित्यकृती निर्माण केल्या. त्यांची पहिली कथा, आजच्या भाषेत कादंबरिका, 'मंदिर' ही असून तिला कुंतलीन पारितोषिक मिळाले होते. परंतु ती त्यांनी एका मित्राच्या नावाने ( सुरेंद्रनाथ गांगुली ) स्पर्धेत दिली होती. ती काही प्रसिद्ध झालेली नाही. म्हणून त्यांची पहिली प्रकाशित कादंबरी 'बडी दीदी' हीच होय आणि शेवटची 'विप्रदास.' या साहित्यसृष्टीत असंख्य स्त्री–पुरुष आणि बालके अवतरली आहेत. शरच्चंद्रांनी आपल्या मानसकन्यापुत्रांच्या बाह्याकृतींची वर्णने केली असली तर अक्षरशः शेकडो पृष्ठे व्यापली असती. शरच्चंद्रांच्या आधीचे बंगाली कादंबरीकार, विशेषतः बंकीमचंद्र आपल्या नायिकांच्या लावण्याची विस्तृत वर्णने करीत. शरदबाबूंनी ही शरीरवर्णने कधीच केली नाहीत. हे वैशिष्टय म्हणावयाचे नसले तरी वैगुण्य निश्चितच नव्हे. शरदबाबू व्यक्तीच्या मनाचे असे काही प्रभावी दर्शन घडवतात की, ती व्यक्ती वाचकाच्या मनात कायमचे घर करून राहते. प्रा. गंगाधर गाडगीळ यांच्याच शब्दात सांगायचे, तर ते आपल्या

मानसकन्यापुत्रांच्या ' आत्म्यालाच हात घालतात.'

शरच्चंद्रांचे व्यक्तिदर्शन एकपरीने अपूर्ण असले तरी मानसदर्शन परिपूर्ण असते. स्वभावदर्शनावर त्यांचा भर असतो. म्हणून व्यक्तिदर्शन घडविताना व्यक्तीची अंगकाठी, चेहरेपट्टी अगर वेषभूषा यांचा तपशील ते देत नाहीत. कमीत कमी शब्दांत व्यक्तिचित्र रेखाटतात. ' सव्यसाची '(पथेरदावी ) मधील सुमित्रेचे व्यक्तिचित्र रेखाटताना ते लिहितात, ' तिचे अतिअल्प बोलणे, तिचे मादक सौंदर्य, तिचे पडणारे प्रत्येक पाऊल, तिची संयमित परंतु गंभीरपणे वाद करण्याची शैली, तिचे अचंचल आचरण, भाव व गांभीर्य, यामुळे या गुप्त संघटनेत राहूनही तिच्या अलिप्तपणाचा सर्वच जण आतल्या आत अनुभव घेत होते ? ' परिणीता ' मधील ललितचे वर्णन तिच्या मामाच्या तोंडून कळते ते असे—" ललिता दिसायला काळीसावळी असली तरी तिचे डोळे, तिचा चेहरा, तिचं हसणं, तिची दयामयता पृथ्वीवर अन्यत्र कोठेही सापडणार नाही." ' चरित्रहीन ' मधील किरणमयी अत्यंत लावण्यवती आहे. पण त्या लावण्याचे वर्णन कळते ते कसे ? सतीश म्हणतो, " तुमच्यासारखं रूप जगात कुठं सापडणार नाही. " ती स्वतः म्हणते, " माझ्या या देहाचं सौंदर्य म्हणजे तुम्हा पुरुषांच्या नजरेचं नव्हे. पण माझ्या स्वतःच्या नजरेतसुद्धा एक अद्भुत निर्मिती आहे. " अशीच वर्णने सर्वत्र आढळतात. कायावर्णन टाळण्यामागे त्यांचा काय हेतु असेल ? कदाचित् वाचकांची मने पात्रांच्या मानसदर्शनावर केन्द्रित व्हावीत हाही असू शकेल. किंवा कायावर्णनानंतर शारीरिक मीलनाचा मोह होऊ नये अशा हेतूनेही त्यांनी कायावर्णनाला तर फाटा दिला असेल अथवा बाह्यवर्णनांनी वाचकांना आकर्षित करण्याच्या सवंगतेचा त्यांना तिटकारा वाटत असेल.

शरच्चंद्रांना माणसाची चांगली बाजूच तेवढी दिसते. माणूस वाईट असू शकतो यावर त्यांचा विश्वासच दिसत नाही. वरवर वाईट दिसणाऱ्या व्यक्तीतही त्यांना मानवतेचा साक्षात्कार होतो. जी माणसे वाईट बनतात ती मनाच्या दुबळेपणामुळे. शरच्चंद्रांच्या साहित्यसृष्टीतील माणसे दारू पितात, अफू खातात. तरी त्यांच्याबद्दल तिटकारा वाटत नाही. देवदास हे उत्कृष्ट उदाहरण दाखविता येईल. श्रीकांत हे सुद्धा चांगले उदाहरण आहे. राजलक्ष्मी आणि किरणमयी यांच्या पतित जीवनाबद्दलही वाचकाला सहानु-

भूतीच वाटते. शरच्चंद्रांच्या कादंबऱ्यांतील चांगली माणसे वाईट माणसांना दूर लोटत नाहीत. त्यांचा तिरस्कार करीत नाहीत. अर्थात् शरच्चंद्रांना अतिरेकी व आततायी माणसे दिसतच नाहीत असे नाही. त्यांच्या पार्श्वभूमीवर सज्जनांचे सज्जनपण अधिक उठावदार दिसते. ही सज्जन माणसे दुःखाला घाबरत नाहीत. पण दुःख भोगतानाही आपले चांगुलपण सोडीत नाहीत. परिस्थितीला शरण जात नाहीत.

आजचे लेखक ज्या दृष्टिकोनातून मनोविश्लेषण करतात तो दृष्टिकोन शरच्चंद्रांना एकतर अवगत नसावा किंवा मान्य नसावा. मानवी मन हे कामप्रवृतीचे कोठार आहे असा वर्तमान लेखकांचा सिद्धान्त आहे. कामप्रवृत्ती ही माणसाची सहजप्रवृत्ती ( instinct ) असली आणि जीवनात तिचा आविष्कार दैनंदिन असला तरी कामाचाराची वर्णने वर्ज्य मानली आहेत. भारतीय साहित्यशास्त्राने शृंगार हा रसराज मानलेला असला तरी त्याचा आविष्कार संयमित करण्यावरही भर दिलेला आहे. उलट आधुनिक काळात पाश्चात्य मानसशास्त्रीय सिद्धांत आणि तद्भव उघड शृंगारचेष्टा यांचा वापर भारतीय लेखक करू लागले आहेत. यालाच वास्तवता मानण्याचा प्रघात पडलेला आहे. मनोविश्लेषण, संज्ञाप्रवाह दर्शन आणि मुक्त प्रणयचेष्टांची वर्णने हा आधुनिक कादंबरीचा विशेष. शरच्चंद्र धीटपणे मनोदर्शन घडवतात. अगदी आत्म्यालाच हात घालतात. मात्र या अंतःसृष्टीत त्यांना अश्लील, विभत्स किंवा ओंगळ काही दिसतच नाही. शरच्चंद्रांचे मानसपुत्र व विशेषत्वाने मानसकन्या परंपरेविरुद्ध बंड करायला सिद्ध असतात. आपल्या मनातील अनुराग व्यक्त करताना समाजनीतीची पर्वा करीत नाहीत. राजलक्ष्मी–श्रीकांत, अभया–श्रीकांत, देवदास–पार्वती, देवदास–चंद्रमुखी, सतीश–सावित्री, किरणमयी–दिवाकर, कमला-अजीत, असे कितीतरी विवाहबाह्य प्रेमसंबंध त्यांनी रंगविले आहेत. या प्रेमी युगलांकडे पाहून कधी कधी असाही आभास होतो की शरदबाबूंना विवाहबाह्य म्हणजेच सामाजिकदृष्टचा व्यभिचारी प्रेमाचे वर्णन करण्याची आवड असावी. यात तथ्य नाही असे नव्हे. पण शरदसाहित्यात जे स्त्री–पुरुष आकर्षण दिसते ते शारीरिक नसून आत्मिक आहे. शरच्चंद्रांच्या कादंबऱ्यांत मुक्त शृंगार सापडत नाही. संयम हा त्यांच्या लेखणीचा म्हणा अगर मनाचा

म्हणा मोठा गुण होय. या बाबतीत ते स्वतःच सांगतात, " आलिंगनाची बात तर दूरच, पण अगदी नाइलाज असेल तरच माझ्या कथांत क्वचित प्रसंगी मी चुंबनादी गोष्टींचे वर्णन करतो. स्त्री-पुरुषांत या गोष्टी घडतातच आणि त्यामध्ये काही दोष आहे असेही मी मानीत नाही... त्यांचे प्रदर्शन करावे यात मला लज्जा वाटते. कदाचित् ही माझी दुर्बलताही असेल. " परंतु ही त्यांची दुर्बलता आहे असे म्हणवत नाही. त्यांच्या साहित्यविषयक निकोप दृष्टीचा तो सहजाविष्कार होय. एकीकडे समाजनीतिबाह्य संबंधाचे धीटपणे चित्रण करूनही त्यात सवंगपणा येणार नाही. याची ते दक्षता घेतात.

शरदबाबूंची पात्रेच अशा मुशीतून ओतलेली असतात की, ती प्रमाची उत्कटता प्रणयाच्या माध्यमातून व्यक्त न करता संयमाच्या, त्यागाच्या व सेवेच्या माध्यमातून व्यक्त करतात. त्यामुळेच या पात्रांच्या वर्तनातून मांगल्याचा, उदात्ततेचा व दिव्यत्वाचा प्रत्यय येतो. ती प्रेमी युगुले शृंगार-चेष्टा करीत नसतीलच असे कसे म्हणावे ? पण विवाहबाह्य संबंधांतून येणाऱ्या मातृत्वाचे कोठेही दर्शन घडत नसल्याने ती संयम बाळगीत असतीलही असे वाटू लागते. बालविधवा सावित्री आपल्या प्रियकराला सांगते, " या देहाचं पुष्प तुमच्या पूजेसाठी अर्पावं एवढं पावित्र्य या देहाला नाही. प्रियकराला सर्वस्व अर्पण करण्यात कोणत्या स्त्रीला तृप्ती, आनंद व समाधान लाभणार नाही ? पण प्रणयाचा पेला प्रियकराला देण्याच्या क्षणी मोठ्या चातुर्याने आपले शरीर दूर ठेवणारी सावित्री अपूर्वच नव्हे का ; बरे, ती म्हणते त्यात असत्यही काही नाही. तथापि, सत्य एवढंच आहे की, आपण विधवा आहोत व आपले शरीर पतीचे आहे म्हणून ती प्रियकराला दूर ठेवून आपल्या आंतरिक संस्कारांनुसार शरीराचे पावित्र्य कायम राखते. अर्थात् शरयू तिच्याहून वेगळी दाख़वायला शरच्चंद्र कचरले नाहीत. लग्नाशिवाय ती प्रियकराजवळ राहते. एवढा धीटपणा दाखवूनही मूळातील स्त्रीचे सौजन्य ती जपते. म्हणूनच तिच्याही वर्तनात तिरस्करणीयता न येता अनुकंपा जागृत होते. व्यक्तिदर्शनातील हे वेगळेपण हा शरच्चंद्रांचा विशेष गुण मानावा लागतो.

शरच्चंद्रांच्या काळचे कादंबरीकार व्यक्तिचित्रण करताना व्यक्ति-

विशेष आणि स्वभावविशेष यावर भर देत. हे व्यक्तिचित्रण भडक, ठोकळेबाज व नमुनेबाज असे. म्हणजे असे की चांगली व्यक्ती ही चांगुलपणाचा आदर्श नमुना तर वाईट व्यक्ती वाईटपणाचा अतिरेकी नमुना असे. कोणतीही व्यक्ती कोणत्याही परिस्थितीत सहसा आपला स्वभावधर्म सोडायला तयार नसते. अलंकारिक भाषेत सांगायचे तर हत्ती नेहमीच सरळ चालणार उंट तिरकसच चालणार, घोडा नेहमी अडीच घरे चालणार. शरदसाहित्यात असे आढळत नाही. मराठी कादंबरीत प्रारंभीच हरिभाऊंनी रंगविलेल्या शंकरमामासारखा खलपुरुष अपवादानेही सापडत नाही. चांगली वाटणारी माणसे असामाजिक समजले जाणारे वर्तन करायला कचरत नाहीत. समाजाने त्याज्य ठरवलेल्या व्यक्तीही आपल्या उदात्त वर्तनाने दिपवून टाकतात आततायी माणसेही अंतर्यामी दयावंत दिसतात. त्यांच्या साहित्यसृष्टीत माणसे विनयभंग किंवा बलात्कार याचा विचारच करीत नाहीत. विवाहबाह्य प्रेमातही उच्छृंखल बनत नाहीत. ' गृहदाह ' मधील अचला आणि सुरेश यांची व्यक्तिचित्रे चिंतनीय आहेत. श्रीकांत आणि देवदास हे नायकही लक्षणीय आहेत. 'विप्रदास' मधील वंदना शेवटी पार बदलून जाते. अशा किती व्यक्ती सांगाव्या ? असामाजिक वर्तन करणारी ही माणसे बंडखोर वाटत नाहीत, उलट दुबळी वाटतात. दुबळी असूनही ती सहानुभूतीला पात्र ठरतात. ' पल्ली समाज ' मधील रमा आपल्या प्रियकराला लौकिकदृष्टचा विरोध करूनही निरोप पाठवते, " तू मला जितकी वाईट समजतोस तेवढी मी वाईट नव्हते. तुला मी जेवढं दुःख दिलं त्याहून अधिक दुःख मी सहन केलं आहे." हा मनस्तापच व्यक्तीला उंच बनवितो.

□ □ □

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२२६०५
निबंध २८७४१
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

□

# चार

## शरच्चंद्रांच्या कादंबऱ्यातील समाजदर्शन

मानवी स्वभावाचे सूक्ष्म निरीक्षण हा शरच्चंद्रांचा खास गुण.' रामेर सुमती ' मधील नारायणी, ' मेजदिदी ' मधील हेमांगिनी किंवा ' बिंदर छेले ' मधील बिंदू यांचे चित्रण या संदर्भात विशेष उल्लेखनीम आहे. वात्सल्य हा स्त्रीचा सर्वांत प्रमुख गुण आहे याची शरच्चंद्रांना असलेली जाणीव या नायिकांच्या चित्रणातून व्यक्त झाली आहे. स्त्रीचा मातृत्वाचा गौरव खूप झाला; पण स्वतःच्या नसलेल्या मुलावर मायेची पाखर घालून त्यासाठी कुटुंबीयांची नाराजी ओढवून घेणाऱ्या जरा जगावेगळ्या स्त्रिया रंगवाव्या तर शरदबाबूंनीच. बिंदू आपल्या शेवटच्या क्षणी आपल्या जावेला म्हणते, " मी जर जगले वाचले ना ताई, तर एक दिवस तू पाहशील... सर्व लोक माझ्याकडे हात दाखवून म्हणतील की, ही अमूल्यची आई आहे. " बिंदूला मूल होत नाही याचे बिंदूवर होणारे परिणाम त्यांनी किती सूक्ष्मपणे टिपले आहेत. तिला फिट्स येतात, सर्वांशी ती कठोरपणे वागते, नवऱ्याशी तुटकपणे वागते. दिराच्या मुलावर माया करते अशा अनेक गोष्टी ते ओघात चित्रित करतात.

शरच्चंद्रांचे निरीक्षण किती सूक्ष्म आहे याची साक्ष कशी पटते हे 'श्रीकांत' कादंबरीवरून पाहूया. सुरवातीचा श्रीकांत परंपरेच्या मार्गाने जाणारा असतो. त्याची भेट इंद्रनाथाशी होते. हा इंद्रनाथ कोणतेही सामाजिक मूल्य न मानणारा असतो. तो आपल्या सहजप्रवृत्तीनुरूप वागतो. सर्वांच्या समोर बिडी पितो, खिशात भांगेची पाने बाळगतो, विभक्त जीवनाचा तो पुरस्कर्ता आहे. रात्रीच्या निबिड अंधारात इंद्रनाथ श्रीकांतला मासे धरण्यासाठी घेऊन जातो. त्याच्या संगतीने पुढे श्रीकांतही मनसोक्त वागू लागतो. हा सर्व भाग मानसशास्त्रीय असून कुशलतेने रंगविला आहे. राजलक्ष्मी आणि श्रीकांत यांचे संबंध वर्णन करतानाही राजलक्ष्मीच्या मानसिक ओढाताणीने मनोज्ञ वर्णन आढळते. राजलक्ष्मीचा हा मानसिक संघर्ष परंपरा विरुद्ध प्रेम असा आहे. राजलक्ष्मी पतिता असली तरी परंपरेला जपते. अशा काही उदाहरणावरून शरच्चंद्रांच्या व्यक्तिदर्शनातील कौशल्याची जाणीव होते.

**भारतीय मनाचा वेध**

शरदबाबूंच्या कादंबऱ्यांतून चित्रित करण्यात आलेले समाजजीवन किमान पन्नास–साठ वर्षांपूर्वीचे बंगाली जीवन आहे. तसे पाहिले तर त्यांच्या कादंबऱ्यांतून प्रामुख्याने कौटुंबिक जीवनच रंगवलेले आहे. ज्या रूढ अर्थाने आपण सामाजिक हा शब्द वापरतो त्या अर्थाने शरदबाबूंच्या कादंबऱ्यांना सामाजिक हे विशेषण लावणे कठीण आहे. आजच्या कादंबरीकाराला ज्या प्रकारे सामाजिक व आर्थिक विषमतेविषयीची जाणीव व चीड असते त्याप्रमाणे ती शरच्चंद्रांच्या ठिकाणी आढळत नाही. तरीही त्यांच्या कादंबऱ्या हेतुपूर्ण आहेत. त्यांनी स्वतःच म्हटले आहे– " I have always held that far from keeping away from public affairs, creative artists have an additional responsibility. In every country the burden of helping to build a happier future rests to no small extent with its men of letters and educationists. " " सदैव मी असे मानत आलो की, निर्मितिक्षम कलावंताने समाजजीवनापासून दूर तर राहू नयेच; पण त्याच्यावर आणखी एक जबाबदारी असते. प्रत्येक देशात उज्ज्वल भविष्य निर्माण करण्यासाठी मदत करण्याचा भार

साहित्यिक आणि शिक्षणतज्ञ यांच्यावरच मोठ्या प्रमाणात असतो." (शरच्चंद्र चॅटर्जी–हुमायून कबीर–युसूफ मेहेरअली यांची प्रस्तावना पृ. २ पद्मा प्रकाशन १९४२ ) असे असले तरी शरदबाबुंच्या कादंबऱ्यांतून घडणारे तत्कालीन समाजाचे दर्शन धूसर आहे, विस्कळीत आहे. त्यातील काही धागे जुळवण्याचा हा प्रयत्न आहे.

शरदबाबूंची कादंबरी प्रादेशिक आहे. तरीही ती स्थलकालाच्या मर्यादा उल्लंघून जाते. त्यांच्या कादंबऱ्यांतून बहुधा ग्रामीण भागातील सधन जमीनदार कुटुंबातील जीवनाचे दर्शन घडवलेले दिसते. तरीही ज्या सामाजिक पार्श्वभूमीवर ती आधारलेली असते ती सोडून दलितपीडितांच्या चित्रणात रंगून जाते. त्यांची इतकी उदात्त चित्रे रंगवते, की त्या अविस्मरणीय बनतात. शरदबाबूंच्या कादंबरीचे आणखी एक वैशिष्टच असे की, कथानिवेदनाच्या वेगवेगळ्या पद्धती, उत्कंठा, विस्मय यांचा वापर, कथानकातील संघर्ष, नायक–नायिकांची सविस्तर वर्णने इत्यादी गोष्टींना रूढ पद्धतीने तिच्यात थाराच नाही. म्हणूनच तिच्यातील व्यक्तिरेखा अशरीरी वाटतात. तिच्यातील निसर्ग धूसर भासतो. सामाजिक पार्श्वभूमी अस्पष्ट असल्याचे जाणवते. तरीही शरदबाबूंच्या कादंबऱ्या विलक्षण प्रभावी आहेत. कारण त्यातील समाजजीवन बंगाली असले तरी मन भारतीय आहे. या भारतीय मनाचा वेध घेण्यात शरदबाबू रमलेले दिसतात.

शरच्चंद्रांच्या कादंबऱ्यांतून बव्हंशी ग्रामीण जीवनाचे दर्शन घडते. या ग्रामीण जगातील व्यक्ती सनातनी, सश्रद्ध आणि दैववादी असतात. या जगात दोनच वर्ग असत. ते वर्ग म्हणजे गावातील जमीनदार आणि त्यांची कुळे किंवा नोकरवर्ग. त्या काळी ( आणि अजूनही ) त्या ग्रामीण जगात पांढरपेशा मध्यमवर्गच अस्तित्वात नव्हता. जमीनदार आणि कुळांचे संबंध प्रेमाचे, स्नेहाचे व खेळीमेळीचे असत. क्वचित जुलमी, व्यसनी आणि कुलांगार तरुण जमीनदार दिसतात. गावातुन दारिद्र्य असले तरी कोणालाच त्याची खंत दिसत नाही. त्याविरुद्ध कोणीच त्रागा करताना दिसत नाही. श्रीमंतांची काय, गरिबांची काय पैसा मिळविण्यासाठी धडपड दिसत नाही. 'ठेविले अनंते तैसेचि राहावे' अशी वृत्ती दिसते. एकूण संपूर्ण ग्रामीण जीनन संथ आणि शांत दिसते. (तसे आज दिसत नाही.) (पहा–गणदेवता

ताराशंकर बंदोपाध्याय ) शरच्चंद्रांच्या साहित्यसृष्टीतील श्रीमंत जमीनदार आपल्या नोकरांशी प्रेमाने वागतात. किंबहुना ही नोकरमंडळी मालकांच्या कुटुंबातील व्यक्ती बनूनच वावरतात. या दास–दासींचे आपल्या मालकांवर अकृत्रिम प्रेम असल्याचे आढळते. ' श्रीकांत ' मधील रतन, ' चरित्रहीन ' मधील सावित्री व विहारी, ' विप्रदास ' मधील अन्नदा ही काही उदाहरणे, तशी ही समाजाच्या खालच्या थरातील मंडळी असली तरी ती विशिष्ट जीवनमूल्यांना जपताना दिसतात. त्यासाठी आपले सर्वस्व लुटून द्यायला तयार असतात.

**संस्कृतीचा मनोहारी विशेष**

शरदबाबूंच्या काळी बंगाल्यात अविभक्त कुटुंबपद्धती होती जरठ तरुणी–विवाह आणि बालविवाह रूढ होते. कुटुंबात एकदोन बालविधवा असायच्या. त्या विरक्तपणे राहात. देवधर्मात वेळ घालवीत. त्यांचे जीवन परावलंबी, सहानुभूतिशून्य आणि केविलवाणे असे. अशा विधवांच्या करुण जीवनाचे वास्तव चित्रण करून हरिभाऊ आपट्यांनी महाराष्ट्रातील वाचकांचा सहानुभाव जागृत करण्याचा प्रयत्न केला. बरेच यशही मिळविले. उलट शरच्चंद्रांनी अशाच विधवांचे चित्रण असे काही उदात्त केले की, ते वाचून वाचक रोमांचित होतो. त्यांच्याविषयी करुणा अगर सहानुभूती वाटण्याऐवजी विस्मयजन्य आदरभाव जागृत होतो. अति–सामान्य आणि विपद्ग्रस्त विधवा शरदबाबूंच्या लेखणीच्या स्पर्शाने असामान्य आणि आदरणीय बनून जातात. पुष्कळदा परिस्थितीच्या कचाट्यात सापडून वाममार्गाला लागलेल्या विधवासुद्धा आपल्या त्यागाने, मानसिक पावित्र्याने आणि माधुर्याने वाचकांना मोहूनच नव्हे तर भारावूनच टाकतात. 'श्रीकांत' मधील राजलक्ष्मी, ' चरित्रहीन ' मधील किरणमयी, ' शुभदा ' मधील ललना अशी कितीतरी नावे या संदर्भात मनात येतात. या सामान्य स्त्रिया प्राप्त विपत्तीबद्दल खंतावून, खचून जाण्याऐवजी परिस्थितीशी सामना देतात. आपल्या ममताळू व सेवाभावी वृत्तीने वाचकांच्या भावनांचे उन्नयन करून टाकतात. स्त्रीची सहनशीलता व सेवाभाव हा भारतीय संस्कृतीचा मनोहारी विशेष. त्याचे अत्यंत प्रत्ययकारी व उदात्त चित्रण करून शरदबाबूंनी कादंबरीला एक नवी दिशा दाखविली.

शरच्चंद्रांच्या कथाविश्वातील समाज स्थितिप्रिय आहे. त्या समाजातील माणसे (आणि बायकासुद्धा) आपल्या संस्कृतीची जपणूक करताना दिसतात. त्यांची संस्कृती, रूढी, परंपरा आणि विशिष्ट जीवनमूल्यांनी घडलेली असते. वास्तविक शरच्चंद्रांच्या काळी ब्राम्हो समाजाची चळवळ होती. इंग्रजी शिक्षणाचा प्रचार व प्रसार सुरू होता. स्त्रीशिक्षण व स्त्रियांचे हक्क याविषयी जागृती दिसत होती. शरदबाबूंच्या कथाविश्वात या सर्वांची चाहूल ऐकू येते. मात्र प्रतिसाद उमटलेले दिसत नाहीत. ज्या रवींद्रनाथांचे वाङमय वाचून शरच्चंद्रांनी कादंबरी लेखनाची स्फूर्ति घेतली त्या रवींद्रांच्या कथाविश्वातील स्त्रिया उच्च वर्णीयातील शिक्षित आणि पुरोगामी विचाराच्या आहेत. त्या सनातन संस्कृतीविरुद्ध बंड करू पाहतात. मात्र पुरुषात वावरूनही त्या पुरुषांशी स्पर्धा करू इच्छीत नाहीत. अर्थात तत्कालीन पुरुषवर्गाला त्यांची मते रुचत नाहीत हा भाग वेगळा ! रवींद्रांच्या 'विनोदिनी' (चक्षुशल्य). 'दामिनी' (चतुरंग), 'विमला' (घरे बाइरे) आदि स्त्रिया मानसिक स्खलनाच्या बळी असूनही त्यांचा तोल पूर्णपणे सुटलेला दिसत नाही. शरच्चंद्रांनी रंगविलेल्या 'सती' (विप्रदास), 'बिंदुवासिनी' (बिंदूचे बाळ), 'नारायणी' (रामेर सुमती), 'बिराज' (बिराजबहु), आदी सामान्य गृहिणी किंवा अन्नदा, सावित्री अशा दासी वाचकांना चटका लावून जातात, त्या त्यांच्यातील प्रेम, भक्ती, जिव्हाळा यांच्या दर्शनाने. त्यांच्यात बडखोरीचे नावनिशाण नाही. आहे ती तडजोड.

**बोलक्या सुधारकांबद्दल आकस**

शरदबाबूंना भारतीय संस्कृतीविषयी आदर असावा. कदाचित् सुधारकांविययी आकस असावा. पण या संबंधात निश्चित विधान करणे कठीणच आहे. 'चरित्रहीन' मधील सतीश मेडिकल कॉलेजमध्ये शिकत असूनही स्नानसंध्या केल्याशिवाय अन्न ग्रहण करीत नाही. मांत्र हुक्का पिण्यात त्याला काही वावगे वाटत नाही. प्रसंगी मित्रांबरोबर दारू पितानाही तो कचरत नाही. 'सव्यसाची' (पथेरदावी) मधील अपूर्व पदव्युत्तर शिक्षण घेऊनही संध्यापूजा करतो. डोक्यावर चक्क शेंडी ठेवतो. 'विप्रदास' मधील विप्रदास कलकत्त्यात व्यापार करतो तरी चहाला स्पर्श करीत नाही. पहाटे उठून स्नान व ध्यान उरकल्यावरच

इतर कामाला लागतो. एकादशीचा उपवास कडकडीत करतो. कलकत्यातील सुधारकांबद्दलचे त्याचे उद्‌गार मार्मिक आहेत. तो म्हणतो, "मी कलकत्यात पाहिलं आहे. बोलण्याचंच अवडंबर मोठं—काही मानीत नाही! म्हणतात – जातिभेदावर विश्वास नाही म्हणतात – शिविगाळ करतातही पुष्कळ प्रसंग आला की तोंड लपवतात. शोधून सुद्धा सापडत नाहीत कुठं !" हे उद्‌गार वाचून वाटते की, शदरबाबूंच्या अंतर्मनात बोलक्या सुधारकांबद्दल आकस असावा !

शरच्चंद्रांच्या साहित्यसृष्टीतील समाजात जातिपाती आहेत. जातिसंस्थेवर श्रद्धा आहे. म्हणून ग्रामण्येही आहेत. तरीसुद्धा त्या विश्वातील माणसे माणुसकीला महत्त्व देताना दिसतात. सर्वसामान्य लोकांच्या मनात ब्राह्मणवर्गाबद्दल आदरभाव आढळतो. ब्राह्मणवर्गातही आढ्यतेची व इतरांबद्दल तुच्छतेची व तिरस्काराची भावना दिसत नाही. 'विप्रदास' मधील रॉयसाहेब परदेशात जाऊन आले म्हणून त्यांना जातीतून बहिष्कृत व्हावे लागते आणि त्यांची मुलगी कायस्थाशी लग्न करणार असल्याचे ऐकून विप्रदासाची आई तिचे तोंड बघायला तयार होत नाही. 'चंद्रनाथ'मधील सुलोचना मुलीला घेऊन घराबाहेर पडली व राखालचे आश्रयाला राहिली, (रखेली म्हणून नव्हे) म्हणून तिच्या मुलीच्या नशिबी वनवास येतो.

या समाजातील स्त्री–पुरुष प्रवाहपतित दिसतात. सहसा कुणी प्रवाहाविरुद्ध जाण्याची ईर्ष्या बाळगत नाही. 'शेषप्रश्न' मध्ये शरदबाबूंनी ज्या पांढरपेशा समाजाचे (अर्थात् शहरी) चित्रण केले आहे त्याबद्दल त्यांना आस्था दिसत नाही. या पांढरपेशा समाजातही जातपातीची जाणीव आहे. त्यांतील माणसे परंपरेला कवटाळून स्वस्थपणे जगू इच्छितात. जीवनातील धकाधकी त्यांना सोसत नाही. फक्त त्यांना दारू आणि जुगार प्रिय आहे. त्याच्या घरातील स्त्रिया लाजाळू, पडदानशीन, पुरषापुढे न येणाऱ्या अशाच दिसतात. शरदबाबूंच्या कथाविश्वातील दोनच व्यक्ती वेगळ्या दिसतात. एक सव्यसाची अन् दुसरी कमल. (शेषप्रश्न) सव्यसाची हा राजकीय क्रांतिकारक तसाच पुरोगामी विचाराचा आहे. तो म्हणातो, " केवळ पुरातन आहे म्हणून कोणतीही वस्तू सत्य ठरत नाही. पुरातनचा मोह धरून चालणार नाही." सव्यसाचीच्या या

विचारात आणि कमलच्यां विचारसरणीत बरेच साम्य दिसते. पण कमल ही हिंदू स्त्री नव्हे. शरदबाबुंच्या कादंबऱ्यांना लोकप्रियता लाभली ती हिंदू स्त्रीच्या उदात्त, सहिष्णू व सेवाभावी चित्रणामुळे, शरबाबूंच्या कादंबऱ्यांतील कितीतरी व्यक्तींचे प्रेम सफल झालेले नाही. कदाचित् देवदास हा अपवाद म्हणावा लागेल. फक्त हे स्त्रीपुरुष नियतीचा निर्णय म्हणून आपल्या विफल प्रेमाबद्दल झुरत न बसता अन्यान्य वाटांनी आपल्या मनोभावनांचे उन्नयन करून घेतात. अशी उदाहरणे सावित्री (चरित्रहीन), रोमा (पल्ली समाज) किरणमयी (चरित्रहीन) यांच्या रूपात आढळतात.

**उदात्ततेचे दर्शन**

शदरबाबू मानवांच्या बाह्यचित्रणात गुंतून न पडता सरळ त्यांच्या आत्म्यालाच हात घालतात. मात्र मानवाच्या अंतरंगात अवगाहन करताना त्यांना आधुनिक लेखकांप्रमाणे ओंगळ अर्वाच्य व बीभत्स असे काही आढ- ळत नाही. ते प्रेमाचे दर्शन घडवतात पण प्रणयाला फाटा देतात. शिवाय शृंगारिक प्रेम एवढाच एक विषय त्यांच्या कक्षेत येत नाही. माया, ममता स्नेह, भक्ती अशा कितीतरी रूपाने त्यांनी प्रेमाचे दर्शन घडविले आहे. त्यांच्या दृष्टीला जे काय दिसते ते उदात्त, आदरसूचक आणि प्रसन्न असते. तसे पाहिल्यास शरदबाबू हे स्त्रीजातीच्या निर्मळ, निरपेक्ष आणि निस्सीम प्रेमाचे शाहीर आहेत.

तत्कालीन बंगाली समाजात अविभक्त कुटुंबपद्धती होती याचा पूर्वी उल्लेख केलेला आहेच. शिवाय शरदबाबूंनी रंगविलेली कुटुंबे जमीनदारांची आहेत. या घरांतून मालक, नोकर, घरातील वडिलधारी मंडळी, त्यांची तरुण मुले, मुली आणि आश्रित असा विशाल परिवार असे. या परिवारात आई-मुलगे, आई-मुली, सासू-सुना, दीर-भावजयी, नणंदा-भावजया अशा वेगवेगळ्या नात्याच्या व्यक्ती असत. क्वचित काही पुरुष क्रोधिष्ट आक्र- स्ताळे व दुराग्रही असले तरी सर्वसामान्यपणे दिलदार, प्रसन्न वृत्तीचे व प्रेमळ असेच आढळतात. स्त्रियांमध्ये काही स्वार्थी, मत्सरी, भांडखोर असल्या तरी अधिकांश सात्त्विक. मर्यादाशील व कर्तव्यपरायण दिसतात. बहुतेक गृहिणी पतिपरायण व इतरांशी मायेने पण अदबीने वागणाऱ्या असतात. तत्कालीन बंगाली स्त्रिया (निदान शरदबाबूंच्या साहित्यसृष्टीतील) शालीन

थट्टेखोर नि तरीहि गंभीर दिसतात. वडीलधाऱ्यांपुढे त्या अदबीने व मर्यादेने वागतात. भेटीच्या वेळी पदर गळ्यात अडकवून नम्रपणे त्यांच्या पायाची धूळ कपाळी लावतात. बंगाली कुटुंबात अशा प्रौढ विधवा असत. तशाच परित्यक्ता व बालविधवाही असत. ( अजूनही तिकडे पुर्नविवाह रुढ झालेले नाहीत.) विधवांचा जीवनक्रम विरक्तीचा, व्रतवैकल्यांनी गजबजलेला, कष्टमय असे, त्यातच त्या समाधान मानीत. तरुण विधवांच्या हृदयातील प्रणयभावना क्वचित उफाळून येतात. तरी पुर्नविवाहाची कल्पना त्यांना पटत नाही, ' शुभदा ' मधील ललना पुनर्जीवन देणाऱ्या सुरेंद्राजवळ लग्नाशिवाय रहावयास तयार होते. मात्र लग्नाला नकार देते. 'चरित्रहीन' मधील किरणमयीचे उपेंद्रावरचे प्रेम असेच अशरीरी आहे. श्रीकांत व राजलक्ष्मी यांचाही प्रेमसंबंध विवाहबाह्य आहे. पण या सर्व संबंधात व्यभिचारी भावाचा अभावच आढळतो. स्त्री पुरुषातील निर्भळ व निस्सीम प्रेमाची विविधरूपे शरदबाबू मोठ्याच कौशल्याने रंगवतात.

**वैश्विक आणि अविस्मरणीय**

शरदबाबूंच्या कादंबरीविश्वातील बहुसंख्य व्यक्ती आपल्या संस्कृतीची जपणूक करताना आढळतात. ही संस्कृती भोग, आणि त्याग, स्वैरता आणि संयम अशा परस्परविरोधी प्रवृत्तींनी घडलेली आहे. म्हणूनच माणसे व्यसनाच्या आहारी जातात. पण ही माणसे एकीकडे मनाच्या दुबळेपणाने दारू पितात तरीं दुसरीकडे आपल्या माणुसकीने दिपवून टाकतात. देवदास हे एक उत्कृष्ट उदाहरण. सनातन भारतीय संस्कृती श्रेष्ठ आहे अशी शरदांची धारणा असावी. म्हणूनच " विप्रवास " मधील वंदना आपले सुधारकी जीवन सोडून पारंपरिक जीवनच पसंत करते. पण शरदांचे खरे वैशिष्टच पतितांच्या चित्रणात आहे. 'श्रीकांत' मधील अन्नदा व राजलक्ष्मी, 'देवदास' मधील चंद्रमुखी, ' शुभदा ' मधील जयावती, ' चरित्रहीन ' मधील सावित्री ह्या अशा काही स्त्रिया, पतिता असल्या तरी प्रेमळ, मधुरभाषी व सहृदय आहेत. आपण पतिता आहोत त्याबद्दल त्यांना खेद वाटत असला तरी खंत वाटत नाही. त्या वृत्तीने धार्मिक आहेत, वर्तनाने उदात्त आहेत. त्यांना समाजात प्रतिष्ठा नसली, नव्हे सामाजिक उपेक्षाच त्यांच्या वाट्याला आली, तरी त्याची त्यांना चीड येत नाही. त्यांच्यातील स्त्रीत्व मेलेले नाही

उदात्तता झाकळलेली नाही.

शरदबाबूंना तत्कालीन बंगाली समाजाचे जे दर्शन घडले आणि त्यांनी वाचकांना घडवले ते असे आहे. शरदांचा बंगाली समाज भावना-प्रधान व रूढिप्रिय आहे. त्या समाजाचे वास्तवपूर्ण आणि कलात्मक चित्र जेव्हा शरच्चंद्र रंगवतात तेव्हा त्यांच्या प्रतिभेच्या प्रभावानें ते चित्र वैश्विक आणि अविस्मरणीय बनून जाते. मराठी वाचकही स्थलकालाच्या मर्यादा उल्लंघून त्यात रंगून जातो. म्हणूनच शरच्चंद्रांच्या शताब्दी समा-रोहात बंगाली लोकांप्रमाणेच मराठी लोकही उत्साहाने सहभागी झाले तर नवल नाही !

□ □ □

□

पाच

# बंगाली कादंबरीतील स्त्री

अखिल भारतात दोन प्रांतांतील स्त्रिया सर्वंच क्षेत्रांत आघाडीवर आहेत. पहिला बंगाल आणि दुसरा महाराष्ट्र. तरीही बंगाली स्त्री हा महाराष्ट्रीयांच्या कुतूहलाचा विषय आहे. सरोजिनी नायडू, कमलादेवी चट्टोपाध्याय, अरुणा असफअली, काननदेवी, देविकाराणी, अमला शंकर आदि विविध क्षेत्रांत कर्तबगारी गाजविलेल्या स्त्रियांमुळे बंगाली स्त्रीवर्गाबद्दल आदराची भावना जागृत झाल्यास नवल नाही. साहजिकच वंगदेशीय स्त्रिया फार सुसंस्कृत आणि व्यक्तिस्वातंत्र्यावर भर देणाऱ्या असल्या पाहिजेत असा एक ग्रह होऊन बसला आहे. बदलत्या कालानुरूप जेवढा बदल अन्यत्र स्त्रीजीवनात झालेला दिसतो तेवढा तरी बंगालच्या स्त्रीजीवनात झालेला आढळतो का, हा प्रश्न विवाद्य ठरेल. सुमारे एक तपापूर्वी काही महिने कलकत्त्याच्या परिसरात घालविण्याचे भाग्य लाभल्यामुळेच मी हे विधान केले आहे. ‘ दुरून डोंगर साजरे ’ अशी परिस्थिती आहे असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. पण या वादात शिरण्याचे कारण नाही. बंगाली स्त्रीजीवनाचा जो आलेख बंकिमचंद्रांपासून अलीकडेच दिवंगत

झालेले ताराशंकर बंदोपाध्याय यांच्यापर्यंत होऊन गेलेल्या प्रमुख बंगाली कादंबरीकारांनी आपल्या कादंबऱ्यांतून काढलेला आहे. त्याचा परिचय करून घ्यावयाचा आहे.

गुरुदेव रवींद्रनाथांना नोबेल पारितोषिक मिळाल्यापासून मराठी साहित्यिकांचे बंगाली साहित्याकडे लक्ष वेधले गेले. आज बंकिचंद्रांपासून अगदी अलीकडील साहित्यिकांच्या बहुतेक कादंबऱ्या मराठीतून भाषांतरित झाल्या आहेत. त्यामुळे गेल्या शंभर वर्षांतील बंगाली स्त्रियांच्या वृत्तीतील, परिस्थितीतील आणि गृहजीवनातील सर्व बदल ( ? ) समजून घेणे सहज शक्य झाले आहे. बंकिमचंद्रांनी ( इ. स. १८३८ ते १८९४ ) एकोणिसाव्या शतकातील उच्चवर्गीय स्त्रियांचे दर्शन घडवले. रवींद्रनाथांनी (इ. स. १८६१ ते १९४१ ) वरच्या थरातील मध्यमवर्गीय स्त्रीजीवनाचे दर्शन घडवले आणि शरच्चंद्रांनी ( इ. स. १८७६ ते १९३८ ) सर्वसाधाराण मध्यम-वर्गातील स्त्रीजीवन उभे केले. तिघांच्याही स्त्रीजीवन दर्शनात सच्चेपणा आहे. अर्थात तिघांनाही आपल्या कल्पनाशक्तीने त्यात रम्यता आणि परिणामकारकता आणली आहे हेही नाकारता येत नाही.

**प्रेमळ गुलामगिरी मान्य**

बंकिमचंद्रांच्या कादंबरीतील स्त्रिया शंभर वर्षांपूर्वीच्या आहेत. त्यातही सरंजामदार वर्गातील म्हणजेच सरदार व जमीनदार यांच्या वाड्यातील आहेत. त्यांच्या नायिका आणि उपनायिका तिलोत्तमा (दुर्गेशनंदिनी) कपालकुंडला ( कपालकुंडला ), कल्याणी ( आनंदमठ ), मृणालिनी ( मृणालिनी ), रजनी (रजनी) या नायिका आणि सूर्यमुखी (विषवृक्ष), लवगलता, ( रजनी ) सुभाषिणी (इंदिरा) या उपनायिका लावण्यवती आहेत. काळेभोर आणि लांबसडक केस हे तर बंगाली स्त्रीचे खास वैशिष्ट्य. पुरुषांना आकर्षित करून लुब्ध करणारी सर्व रतीची आयुधे त्यांच्या देहावर सज्ज असतात. तरीही त्या शीलवती, पतिव्रता आणि सुगृहिणी आहेत. प्रेमळ, विनम्र आणि लाघवी आहेत. पतीची प्रेमळ गुलामगिरी त्यांना मान्य असते, प्रियही असते. पुस्तकी शिक्षणाचा अभाव असला तरी त्यांना त्याची खंत नसते की खेद नसतो. त्यांचे विचार बालपणी वडिलांच्या इच्छेनुसार झालेले असतात. पण त्यामुळे त्या दुःखी कष्टी होत नाहीत. विवाहोत्तर प्रीतीवर त्यांची श्रद्धा आहे; आणि ती त्यांना लाभली. आपल्या

पतीवर त्या मनापासून प्रेम करतात. त्यांची चरणधूळ कपाळी लावण्यात त्यांना समाधान वाटते. कितीही आपत्तींशी सामना करावा लागला तरी त्यांची आपल्या प्रिय पतीवरील निष्ठा ढळत नाही.

दिव्यातून गेल्याशिवाय स्त्रीच्या पातिव्रत्याची कसोटी लागत नाही असा बंकिमबाबूंचा समज दिसतो. त्यामुळे विवाहानंतर अल्पावधीत त्यांच्या नायिकांवर पतिवियोगाची आपत्ती कोसळते. बिचाऱ्यांना स्वस्थ वैवाहिक जीवनाचा लाभच होत नाही. पतिवियोगाने त्या डगमगत नाहीत. शर्थीने मार्ग काढून त्या आपले पति परत मिळवतात. या लढयात खलपुरुषांशी त्यांना सामना द्यावा लागतो. परपुरुषांचे पौरुष अगर सौंदर्य त्यांना विच-लित करू शकत नाही. परक्या पुरुषाचा त्या धिक्कार करतात. जुलूम जबरदस्तीला त्या बधत नाहीत. त्या जशा तेजस्विनी तशाच चतुरही आहेत. विनयशील आणि लाजाळू असूनही निर्भय दिसतात. पण निर्भय असल्या तरी निर्दय नाहीत. त्या उद्योगी दिसतात तरी आरामप्रिय आहेत. सारांश, सनातनीपणाची सर्वच लक्षणे त्यांच्यात दिसतात.

रवींद्रांच्या काळातील स्त्रीजीवन बदललेले दिसते. त्यांनी एकोणीस विसाव्या शतकांच्या संधिकाळातील आणि नंतरच्या काही दशकांतील स्त्री जीवन चित्रित केले आहे. त्याकाळी उच्च मध्यम वर्गातील स्त्रियांना शिक्षण मिळू लागले होते. आचारविचारांनी त्या पुरोगामी बनू लागल्या होत्या. पूर्वीप्रमाणे पुरुषांना भिण्याची, त्यांचा सहवास टाळण्याची वृत्ती त्यांच्यात दिसत नाही. " आम्ही पुरुषांच्या समोर जातो आणि त्यांच्यात बसतो, हे " त्यांना पसंत नसावं " अशी शंका सुचारितेने ( गोरा ) व्यक्त केली आहे. मात्र पुरुषांत मिसळूनही त्या शीलाला जपतात. त्याही आपल्या पतीवर निष्ठापूर्वक प्रेम करणाऱ्या आहेत. परंतु, पतीला आकर्षित करण्याचे त्यांचे साधन लावण्य हे नसून, सोज्वळ व्यक्तिमत्त्व हे असते. एवढा एक फरक सोडला तर त्यांच्यात वरवर फार बदल झालेला दिसत नाही. पूर्वीच्या काळातील स्त्रियांप्रमाणेच त्या डोक्यावरून पदर घेतात. त्यांचे टोक गळ्या-भोवती गुंडाळून पतीची व वडीलधाऱ्या मंडळींची चरणधूळ मस्तकी धारण करतात. पूर्वीच्या स्त्रियांप्रमाणेच त्यांनाही पानाचे विडे खाण्याची आवड आहे.

**रवींद्रनाथांच्या स्त्रीरेखा**

बंकिमचंद्रांची स्त्रीसृष्टी एकसुरी आहे. तिच्यात विविधता आढळत नाही. रवींद्रनाथांच्या स्त्रीसृष्टीत विविधता आहे. त्यांनी चित्रित केलेल्या स्त्रियांत विवाहिता आहेत तशाच विधवाही आहेत. युवती आहेत तशाच प्रौढाही आहेत. या विचित्र वयाच्या व वृत्तीच्या स्त्रिया शिक्षित आणि पुरोगामी आहेत. बंकिमचंद्रांच्या काळी उच्च वर्गातील स्त्रियांना गोषा असे. त्या सहसा घराच्या चार भिंतींबाहेर पडत नसत. त्यांच्या कादंबऱ्यांतील नायिका घराबाहेर पडत. त्या पतीच्या शोधासाठी. रवींद्रांच्या काळी त्या समाजसेवेसाठी घराबाहेर पडताना दिसतात. मात्र त्यांच्या घराबाहेरील वर्तनात संयम असतो. तरीही क्वचित काहीजणी परपुरुषाच्या व्यक्तित्वाने प्रभावित होताना दिसतात. हे स्खलन केवळ मानसिक असते. त्यांचे वर्तन तसे निर्मळ असते. सहसा त्या विकाराधीन होत नाहीत. परपुरुषाच्या गळ्यात पडत नाहीत. विनोदिनी (चक्षुशल्य), दामिनी (चतुरंग) विमला (घरेबाईरे) आणि एला (चार अध्याय) या अशाच काही मानसिक स्खलनाच्या बळी आहेत. तरी त्यांचा तोल सुटलेला नाही. आशेच्या पतीला विनोदिनीची ओढ लागली असली तरी आशा त्याला झिडकारीत नाही. त्याच्यावर प्रेम करीतच राहते. कुमुदिनीला हे जमत नाही. ती आपल्या पतीच्या जीवनाशी समरस होऊ शकत नाही. तिचे मन वडिलांच्या प्रपंचात घोटाळत राहते ( योगायोग). रवींद्रनाथांनी रंगवलेली स्त्रीसृष्टी ही अशी आहे. त्यांच्या कादंबऱ्यांतील नायिका एकीकडे सनातन संस्काराविरुद्ध बंड करू पाहतात तर दुसरीकडे विचारांनी विकारावर मात करू पाहतात. पुरुषांत वावरतात पण त्यांच्याशी स्पर्धा करण्याची ईर्ष्या बाळगत नाहीत. पुरुष–सहवासात रमतात पण तो त्यांचा असावा लागतो. तरीही हे तत्कालीन पुरुषवर्गाला रुचत नसावे. हे सुचारितेच्या वक्तव्यावरून स्पष्ट आहे. तरीही रवींद्रांच्या कादंबऱ्यांतील स्त्रिया वामनराव जोश्यांच्या उत्तरेसारख्या वावदूक नाहीत. त्यांच्यातील प्रेममयी गृहिणी सदैव जागृत असते. विनयशीलतेची मर्यादा त्या कधीच उल्लंघन करीत नाहीत. हे चित्र केवळ बंगाली स्त्रीचे नसून तत्कालीन भारतीय स्त्रीचे आहे.

**शरच्चंद्रांचे स्त्रीविश्व**

शरच्चंद्रांच्या कादंबऱ्यांतील स्त्रीसृष्टी खऱ्या अर्थाने बंगालच्या स्त्री

जीवनाचे व स्त्रीमनाचे प्रतिनिधित्व करणारी आहे. तिच्यात विविध सामाजिक थरांतील विविध वृत्तींच्या स्त्रिया आढळतात. या स्त्रीवर्गात उच्चकुलीना आहेत. तशाच वारांगनाही आहेत. मालकिणी आहेत व मोलकरणीही आहेत. ब-याच सालस सुगृहिणी आहेत तर काही कजाग कर्कशाही आहेत. त्या स्त्रीसृष्टीत जशा सौभाग्यवती आहेत तशाच विधवा आणि परित्यक्ताही आहेत. एवढेच नव्हे तर प्रणयातुर अभिसारिकांप्रमाणेच मुक्त पण्यांगनाही आहेत. स्त्री–जीवनातील. या भिन्न अवस्था. तदनुसार त्या अवस्थांतील स्त्रियांचे आचार आणि विचार असणार. पतिप्रेम आणि कौटुंबिक प्रतिष्ठा लाभलेल्या स्त्रीची अंतःसृष्टी आणि कुटुंबात अडगळीसारख्या वावरणाऱ्या स्त्रीची अंतःसृष्टी ही केव्हाही भिन्नच असणार. हे झाले ढोबळ वर्गीकरण. शरच्चंद्रांच्या साहित्यात अधिक सूक्ष्म दर्शन घडते. म्हणूनच त्यांच्या काही सामान्य मानसकन्या आपल्या त्यागाने, प्रेमळपणाने आणि सोशिकतेने वाचकांवर सखोल परिणाम करतात.

शरच्चंद्र हे रवींद्रांचे समकालीन. रवींद्रांना दिसल्या त्या उच्च घराण्यांतील शिक्षित आणि पुरोगामी स्त्रिया. शरच्चंद्रांच्या स्त्रीसृष्टीत बहुतांश स्त्रिया अशिक्षित आहेत. दोघांनीही तत्कालीन एकत्र कुटुंबपद्धतीचे चित्रण केले. रवींद्रांच्या कादंबऱ्यांतील कुटुंबे सधन आणि सुधारलेली आहेत. शरच्चंद्रांच्या कादंबऱ्यांतील कुटुंबे साधारण आहेत. जुन्या परंपरेतील आहेत. अशा कुटुंबांतील स्त्रीजीवनाचे प्रातिनिधिक प्रभावशाली आणि वास्तवपूर्ण चित्रण शरच्चंद्रांनी केले आहे. म्हणूनच त्यांच्या स्त्रीसृष्टीत केवळ लावण्यवतीच नाहीत. काही स्त्रिया जशा मोहक आहेत तशाच काही रूपाने अगदी सामान्यही आहेत. त्यांच्या ठिकाणी प्रेमळपणा आणि वात्सल्य आहे. सर्वच रूपवती गुणवती नाहीत. तशाच सर्वच गुणवती रूपवतीही नाहीत. स्त्रीसुलभ मत्सर आणि द्वेष जसा दृष्टीस पडतो तसाच भोग आणि त्यागही दिसून येतो. अशा गुणांमुळेच त्यांच्या सती ( विप्रदास ), बिंदुवासिनी ( बिंदूचे बाळ), नारायणी (रामेर सुमती), बिराज (बिराजबहू), कादंबिनी (मेजदिदी ) आदि सामान्य गृहिणीसुद्धा अविस्मरणीय ठरल्या आहेत. अन्नदा व सावित्रीसारख्या दासीसुद्धा मनाला चटका लावतात. बंगाली स्त्रियांची सोशिकता आणि मर्यादशीलता शरच्चंद्रांच्या कांदबऱ्यांतून विशेष जाणवते.

त्याकाळी महाराष्ट्रातील परिस्थिती फार भिन्न नव्हती. एकत्र कुटुंबपद्धतीचे जे चित्रण शरच्चंद्र करतात ते केवळ वस्तुस्थितीचे निदर्शक आहे. नवागत नवरीची होणारी कुचंबणा, सासू आणि नणंदांकडून होणारा छळ, हे एकत्र कुटुंबात त्याकाळी अनुभवाला येणारे दृश्य शरच्चंद्रांच्या कादंबऱ्यात प्रत्ययकारी चित्रित झाले आहे. असे असूनही स्त्रीहृदयातील ममता ज्या स्वरूपात व्यक्त झाली आहे ते उदात्त आहे. घरात छळ सोसूनही धाकटया दिरावर मातृवत् माया करणारी वहिनी किंवा थोरल्या जावेच्या मुलांवर जीव टाकणारी काकू पाहिली की स्त्रीच्या उदार मनाची व ममतामय हृदयाची प्रचिती आल्याने हृदय हेलावून जाते.

**पतितांचे भावजीवन**

श्रीकांत, चरित्रहीन आणि देवदास ह्या कादंबऱ्या आत्मकथेच्या स्वरूपाच्या मानल्या जातात. या कादंबऱ्यांतील अभया. राजलक्ष्मी आणि पार्वती या पतिता त्यांनी प्रत्यक्षात पाहिलेल्या आहेत असे म्हणतात. यातील तथ्य आणि सत्य शोधण्याचा अट्टहास न करताही त्यांच्याद्वारे स्त्रीहृदयाचे जे रम्योत्कट भावदर्शन शरच्चंद्रांनी घडवले आहे ते अविस्मरणीय आहे. पतिव्रता असो की पतिता असो, शेवटी स्त्री ही स्त्रीच असते ! कौटुंबिक जीवनातून उठल्यामुळे मन मारून, पुरुषांना नादी लावून, उदरनिर्वाह करणाऱ्या वेश्यासुद्धा स्त्रियाच असतात. त्यांच्याही हृदयात प्रेम आणि वात्सल्य वसत असते, याची जाणीव समाज ठेवत नाही. त्यामुळे त्याही कठोरता धारण करतात. येथे एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, उपेक्षित पतितांचे चित्रण करून शरच्चंद्रांनी एका मोठ्या स्त्रीवर्गाला न्याय दिला आहे. त्यांच्या भावजीवनाचे दर्शन घडवले आहे. स्वातंत्र्यपूर्वकालीन बंगाली कादंबरीतून जे बंगाली स्त्रीजीवनाचे दर्शन घडते ते असे. त्यांचे कौटुंबिक आणि सामाजिक जीवन कसे होते याची बरीच कल्पना देणारे ते आहे. त्यानंतरच्या कादंबरीकारांनी आपला मोर्चा खालच्या थरातील स्त्रीजीवनाकडे वळवलेला दिसतो. या काळात विख्यात झालेले प्रमुख कादंबरीकार म्हणजे कै. ताराशंकर बंदोपाध्याय, विभूतिभूषण बंदोपाध्याय आणि मनोज बसू या कादंबरीकारांनी बदलत्या ग्रामीणजीवनाचे चित्रण केले आहे. साहजिकच त्यांच्या कादंबऱ्यांतून ग्रामीण वंग-स्त्रींचे दर्शन घडते. या ग्रामवासिनी अशिक्षित

तर आहेतच पण दरिद्रीही आहेत. बंगालच्या खेड्यापाड्यातून आजही दिसणारे दारिद्र्य कल्पनातीत आहे. तरीही या कादंबरीकारांनी टिपलेल्या ग्रामीण स्त्रियांना लाभलेले व्यक्तिमत्त्व विलोभनीय आहे. ' गणदेवता ' ( ताराशंकर बंदोपाध्याय ) मधील ' दुर्गा ' ही एका चांभारची मुलगी, तर ' आरण्यक ' ( विभूतिभूषण बंदोपाध्याय ) मधील ' भानुमती ' आणि ' सुरतिया ' या आदिवासी स्त्रिया असल्या तरी त्यांच्यातही मार्दव आहे. प्रेमळपणा आहे, त्यागाची तयारी आहे. प्रियकरासाठी वाटेल त्या आपत्ती व अपेष्टा सहन करण्यास त्या कचरत नाहीत. ' पाथेर पांचाली ' (विभूति-भूषण) मधील ' सर्वजया ' एक ग्रामीण ब्राम्हणवधू असली तरी रूपवती तर नाहीच पण शिक्षितही नाही. ' निशिकुटुंब ' ( मनोज वसू ) मधील ' सुधामुखी ' ही तर एक अशिक्षित वेश्या आहे. परंतु या सर्व स्त्रियांच्या हृदयात वात्सल्य, त्यागवृत्ती आणि चांगुलपणा आहे. क्वचित आरोग्य निकेतन ' सारख्या कादंबरीत ' मंजरी ', ' लावण्यमयी ' अशा मध्यमवर्गीय स्त्रियाही आहेत. मात्र, ज्या प्रकारची पुरुषांशी स्पर्धा करू पाहणाऱ्या, व्यक्तिस्वातंत्र्यासाठी झगडणाऱ्या आणि आपल्या व्यक्तिमत्त्वाच्या विकासा-साठी कौटुंबिक जीवनाचा बळी देऊ पाहणाऱ्या बंडखोर स्त्रियांची चित्रे अलीकडच्या मराठी कादंबऱ्यांत आढळतात तशी बंगाली कादंबऱ्यांत आढ-ळत नाहीत. नव्या युगाचे हे वारे वंगभगिनींपर्यंत पोचले नसणे शक्य आहे.

बंगाली लोक तसे परंपराभिमानी आहेत. त्यामुळेही तेथील स्त्रियांच्या जीवनात फारसे परिवर्तन झालेले नाही. हल्ली शहरातून स्त्रीशिक्षणाचे प्रमाण वाढले आहे. तरीही बंगाली स्त्रिया वृत्तीने बदललेल्या दिसत नाहीत. त्यांचा भाषाभिमान, प्रांताभिमान आणि परंपराभिमानही कायम आहे. अजूनही बंगाली स्त्री लाजरी–बुजरी आहे. कमालीची मर्यादशील आहे. आजही ती डोक्यावरून पदर घेते, वडीलधाऱ्यांची चरणधूळ कपाळाला लावते. पुरुषांशी फार वाद घालत नाही. पतीला पुरेसा मान देते. एकत्र कुटुंबात राहण्यात तिला काही वावगें वाटत नाही. देवधर्माविषयी तिला आस्था आहे. सारांश, बंगाली स्त्रीजीवनात लक्षणीय परिवर्तन दिसत नाही. मग कादंबरीतील स्त्रीजीवनात ते कसे दिसणार ?...

□ □ □

□

# सहा

## बंगाली कादंबरीचे रवि–चंद्र

साहित्य आणि कलेच्या क्षेत्रात बंगाल प्रांत सदैव आघाडीवर राहिला आहे. बंगाली साहित्याची, विशेषत: कादंबरीची कीर्ती अखिल भारतातच नव्हे तर भारताबाहेर पोचविण्याचे खरे श्रेय प्रथमत: रवींद्रनाथांना व त्यांच्या पाठोपाठ शरच्चंद्रांना आहे. बंगाली कादंबरीचे तेच रवि–चंद्र होत. रवींद्रनाथ जसे वयाने ज्येष्ठ तसेच कीर्तीनेही आघाडीवर होते. ठाकुरांना जागतिक कीर्ती मिळवून देणारे नोबल पारितोषिक मिळाले तेव्हा शरदबाबू साहित्य क्षेत्रात चंचुप्रवेश करीत होते. साहजिकच शरच्चंद्रांनी रवींद्रांना गुरुस्थानी मानले यात नवल नाही. रवींद्रनाथ ठाकुरांची 'गोरा' ही कादंबरी त्यांच्या दृष्टीने आदर्श व उत्कृष्टतेचा मानदंड होती. त्यांनी पाठ्यपुस्तकाप्रमाणे तिची अनेक पारायणे केली होती. रवींद्रनाथ हे बंगाली भाषेतील व साहित्यातील नवतेचे प्रवर्तक होते आणि शरदबाबू त्यांचे पट्टशिष्य. असे असूनही शरच्चंद्रांना आपल्या गुरूच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करण्याची योग्य संधीच लाभली नाही. किंबहुना शरच्चंद्र जेंव्हा ख्याती मिळवू लागले तेव्हा उभयतांमध्ये काही गैरसमज निर्माण झाले. वास्तविक दोघेही

एकमेकाचे मोठेपण ओळखून होते. दोघांनाही एकमेकाबद्दल आदर आणि आस्था होती. तरी परिस्थितीवशतेमुळे मनोमालिन्य पूर्णपणे दूर झालेच नाही.

रवींद्रनाथ आणि शरच्चंद्र हे दोघेही बंगालच्या जनजीवनाचे भाष्यकार होते. तथापि, दोघांची प्रवृत्ती व प्रकृती भिन्न होती. तसे दोघेही बंगाली गृहजीवनातील व्यक्ति-संबंधाचे चित्रण करणारे, वैयक्तिक व सामाजिक समस्या मांडणारे. ते समस्या मांडतात पण त्या सोडवण्याचा प्रयत्न करीत नाहीत. दोघांनीही हेतुपूर्ण लेखन केले तरी त्यांनी लेखनाला प्रचारकी कळा येऊ दिली नाही. मात्र रवींद्रनाथ आदर्शात गुंतून राहतात तर शरच्चंद्र जीवनाचा गाभा उकलून दाखवतात. रवींद्र मानवी जीवनाचे विश्लेषण करतात, चिंतनात रस घेतात. उलट शरद केवळ जीवनाचे यथातथ्य दर्शन घडवतात. ठाकूरांची पात्रे तरल व वेगळ्या जगातील वाटतात तर चटोपाध्यायांची खरीखुरी मानवी वाटतात.

रवींद्रनाथांच्या लेखनात सौंदर्यदृष्टी दृष्टोत्पत्तीस येते तर शरच्चंद्रांच्या लेखनातून एक प्रकारची सनातनी वृत्ती डोकावते. कलात्मकता ही जशी रवींद्रांची शक्ती तशीच उत्कटता ही शरच्चंद्रांची शक्ती. रवींद्रांनी उपदेशापेक्षा अभिव्यक्ती महत्त्वाची मानली. पुष्कळदा त्यांच्या अपयशाला त्यांची तरल पात्रे कारणीभूत होतात. उलट शरच्चंद्रांच्या अपयशाला कारण ठरते ती व्यक्तिनिर्मितीची मर्यादित प्रेरणा. एरव्ही त्यांचे मानस–कन्या–पुत्र म्हणजे रक्तमांसाची माणसे वाटतात. वाचकांशी ती नाते जोडतात. †

शरदबाबूंच्या लेखनावर आणि लेखनशैलीवर रवींद्रनाथांचा विविधांगी प्रभाव दिसत असला तरी शरच्चंद्रांच्या साहित्यात वास्तवतेचे अधिक दर्शन होते. बंगाली गृहजीवन हा दोघांचाही लेखनविषय. वंगीय समाजातील स्थितिशील एकसुरी जीवनाला धक्के देणारे घरगुती संघर्ष आणि समेट यांच्यावरच दोघांनीही आपल्या कथा–कादंबऱ्यांची सृष्टी उभारली आहे.

---

† Tagore's characters are too etherial. Chatterjee's are of the earth, earthy. Sharat Chandra-Humayun Kabir p. 43

कुटुंब हा एक प्रमुख घटक असून त्यातील व्यक्तींच्या विविध व परस्परविरोधी हितसंबंधांतून निर्माण होणारे संघर्ष यांवरच त्यांच्या लेखनाचा भर असतो. वस्तुतः कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीला तिचे व्यक्तिगत जीवन असते. परंतु ते इतके संथ व मर्यादित असते की बाहेरून त्याची चाहूलही ऐकू येत नाही. या माणसांच्या गरजा मर्यादित व त्याहूनही अभिलाषा मर्यादित असतात. त्यामुळे सामाजिक संबंधच नव्हे तर कौटुंबिक संबंधही साचेबंद होऊन बसतात. तथापि, माणूस हा माणूसच असतो. त्याच्याही काही सुप्त भाव भावना इच्छा–आकांक्षा असतातच. साहजिकच कधीतरी संघर्षाला तोंड लागते. मग व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व बदलून जाते. कौटुंबिक एकता भंग पावते. पण माणसांच्या वागण्यात असंभाव्य विक्षिप्तपणा असू शकतो. त्यांच्या वर्तनातून होणारे आणि कल्याणाच्या दृष्टीने होणारे वर्गीकरण यात तफावत पडते. त्याची पूर्वकल्पनाही अशक्यप्राय असते. अनेकदा व्यक्तिगत स्वार्थ सामाजिक मूल्यांवर कुरघोडी करीत असतो. हाच दोघांच्याही कादंबऱ्यांचा आशय व विषय असतो.

व्यक्तींच्या स्वार्थपरायणतेमुळे रूढ कौटुंबिक व सामाजिक आदर्शांना तडा जातो. कौटुंबिक स्वास्थ्य बिघडून जाते. प्रश्न उपस्थित होतात व कथेला विषय मिळतो. नेहमीच्या पद्धतीने हा गुंता सोडवता आला नाही की पर्याय दिसू लागतात. तेच दोघांच्याही कादंबऱ्यांतून दिसतात.

सकृद्दर्शनी दिसणाऱ्या या साम्यातूनही विचारांती दोघांचे वेगळेपण जाणवते. रवींद्रनाथ बंगाली जीवनातील एखादी समस्या नमुन्यादाखल निवडतात. मग त्या विशेष समस्येचे सामान्यीकरण ( जनरलायझेशन ) करून ती रंगवतात. पुष्कळदा ते त्या समस्येला चिंतनात्मक व काव्यमय रूप देऊन मानवी संबंधातील अंतर्दृष्टीचे प्रतीक म्हणून तिचा वापर करतात. त्यामुळे त्यांच्या कथा–कादंबऱ्यांना रूढार्थाने कथानक असे नसतेच. असते ती जीवनाचा अर्थ लावण्याची धडपड. त्यांचा भर असतो विश्लेषणावर कथेतील अनुभव हे फक्त मूल्यांकनासाठी वापरले जातात. शरच्चंद्र ज्या संघर्षाचे चित्रण करतात त्यांच्या सामाजिक आशयाविषयी ते अधिक जागरूक असतात. शरदबाबू जेव्हा एखादी समस्या निवडतात तेव्हा त्या समस्येच्या वास्तवतेवर भर देतात. त्यांच्या कादंबऱ्यांतील घटनांना वैशिष्ट्यपूर्ण

व्यक्तिविशेषांमुळे वेगळाच उदात्त आशय प्राप्त होतो. पात्रांच्या परस्परांतील प्रतिक्रियांतून जे काय विश्लेषण किंवा अर्थ सूचित होतील तेवढेच. याहून अधिक काही अभिप्रेत नसते. काव्यमयता अथवा नाटयपूर्णता केवळ संघर्षाच्या विकासाला पूरक होण्यापुरतीच प्रविष्ट होते. अशा रीतीने शरद‌बाबूंच्या कादंबऱ्यांतून वैश्विक प्रतीकात्मकतेच्या संदर्भात जे काही सुटून जाते ते माणुसकीच्या प्रतिपादनाने भरून निघते.

आपल्या मनात शरच्चंद्रांची जी प्रतिमा आहे ती रूढीविरुद्ध बंड करणाऱ्या आणि सामाजिक दोषांची निर्भीड टीका करणाऱ्या लेखकाची. आपण त्यांना वाखाणतो ते त्यांच्या समाजनीतिविरोधी व बंधमुक्त प्रेमाच्या पुरस्कारासाठी आणि स्त्री–पुरुष संबंधाच्या पुनर्मूल्यांकनासाठी. तसे पाहिल्यास रवींद्रनाथांनी घालून दिलेल्या चाकोरीतूनच ते जाताना आढळतात. रवींद्रांनीही आपल्या कादंबऱ्यांतून प्रीती व प्रणय यांतून उद्‌भवणाऱ्या समस्या हाताळल्या आहेत. वासनायुक्त अभिलाषा आणि सामाजिक निबंध यांचा विचार केला आहे. सामाजिक परंपरा व मानवी सहजप्रवृत्ती (इन्स्टिन्क्ट) यामधील संघर्ष रंगवले आहेत. रवींद्र आणि शरद यांच्या लेखनात फरक आहे तो पद्धतीचा व दृष्टिकोनाचा. शरच्चंद्रांच्या 'शेष प्रश्न' मधील समस्या रवींद्रांनी 'घरे बाहिरे' मध्ये कितीतरी आधी अधिक कौशल्याने मांडल्या आहेत.

शरदबाबूंचे वाङ्मय वाचताना असे आढळून येते की, त्यांच्या कादंबऱ्यांतील पात्रांच्या सामाजिक जाणिवा फार खोलवर रुजलेल्या असतात आणि त्यांच्यामुळे शरदांच्या मानस–कन्या-पुत्रांना प्रादेशिक आवरण लाभते. साहजिकच त्यांच्या पात्रांच्या अंतरंगात प्रवेश करणे परकीयांना जड जाते. पण एकदा का ते साधले तर मग त्यांना बंगाली समाजजीवनाचा गाभाच गवसतो.

'नष्टनीड,' ( विस्कटलेले घरटे ), 'चोखेरबाली' ( डोळ्यातील कुसळ ) आणि 'नौका डुबी' या रवींद्रनाथांच्या सुरुवातीच्या कादंबऱ्यांतून स्त्रीच्या बंडखोर वृत्तीचे रेखाटन आढळते. या कादंबऱ्यांतूनच त्यांच्यातील सौंदर्यवादी कलावंताचे दर्शन घडते. एवढेच नव्हे तर ठाकुरांच्या सर्वच कादंबऱ्या वास्तवाहून आदर्शाकडे झेपावणाऱ्या आहेत. शरदबाबू

कलावंत नाहीत असे नाही. किंबहुना रवींद्र आणि शरच्चंद्र हे दोघेही हाडाचे कलावंत होते. शरदबाबूंची अनुभूती तर अस्सल आहेच पण अभि॰ व्यक्तीही तेवढीच कलात्मक आहे. तथापि, सामाजिक आशयाकडे त्यांचा अधिक कल होता. त्याबद्दल त्यांना विशेष आस्था होती. शरदबाबूंनी सामाजिक व जीवनविषयक शाश्वत मूल्यांचा हिरिरीने पुरस्कार केला. समाजजीवनातील परस्पर संबंधाच्या तळाशी बुडी मारून त्यांचा थांग घेण्याचा त्यांनी प्रयत्न केला. ह्या संघर्षाच्या चित्रणातून सौंदर्यनिर्मिती तर होईलच. पण माणसा–माणसातील हेवेदावे दूर होतील असा त्यांचा दृढ विश्वास होता. याच दृढ विश्वासातूत त्यांच्या कादंबऱ्यांची निर्मिती झाली आहे.

येथवर रवींद्रनाथ आणि शरच्चंद्र यांच्या वाङ्मयीन कर्तृवातील साम्य व विरोध यांचा विचार झाला. एकापरीने दोघेही समकालीन. दोघेही श्रेष्ठ दर्जाचे साहित्यकार. त्यांच्यात स्नेहदेखील होता. परंतु त्यांच्या काळात जे राजकीय आंदोलन सुरू होते त्याकडे बघण्याचा त्यांचा दृष्टिकोन भिन्न होता. यामुळेच ' शिक्षार मीलन ' या गुरुदेवांच्या निबंधाचा ' शिक्षार विरोध ' ह्या शोर्षकाच्या निबंधाने शरच्चंद्रांनी विरोध केला. ठाकुरांना ' सत्याग्रह ' मान्य होता मात्र स्वदेशीच्या चळवळीतील विदेशीची होळी अमान्य होती. गांधीजींविषयी आदर व प्रेम असूनही रवींद्रनाथ असहकारा-पासून अलिप्त राहिले. उलट शरच्चंद्रांनी गांधीजींच्या चळवळीत सरळ उडी घेतली. शरदबाबूंनी गुरुदेवांचे मन वळविण्याचा प्रयत्नही करून पाहिला. रवींद्रनाथांवर ते रागावले पण पुन्हा त्यांनी रवींद्रांची क्षमाही मागितली. असे त्यांचे जगावेगळे संबंध होते.

रवींद्रनाथ आणि शरच्चंद्र या दोघांबद्दल केवळ बंगाली वाचकांनाच नव्हे तर भारतातील अन्य भाषिकांनाही कमालीचा आदर वाटतो. मराठी भाषिकांना तर ते आपलेच वाटतात. दोघेही आपल्या वाङ्मयाच्या रूपाने देश–कालावर मात करून राहिले आहेत. कारण ढोघांनीही आपापल्यापरीने वेगवेगळ्या पद्धतीने जरी बंगाली जनजीवनाचे चित्र रेखाटले असले तरी सामान्य स्त्री–पुरुषांच्या जीवनाचे जे उन्नयन केले ते पाहून कालचाच नव्हे तर आजचा सुबुद्ध वाचक हतबुद्ध होऊन जातो. रवींद्र वर्तमानाकडून भविष्या॰

कडे झेप घेतात तर शरच्चंद्र वर्तमानात अडकून पडतात. पारंपरिक मूल्य-कल्पनांचा विरोध करण्यात दोघेही अग्रेसर आहेत. तथापि, दोघांच्याही साहित्याची बैठक भारतीय आहे. दोघांनाही भारतीय संस्कृतीबद्दल अभिमान होता. दोघांनीही भारतभ्रमण करून जीवनाची विविधता व विचित्रता आत्मसात केली. बंगाल आणि बंगाली जीवन यांच्या माध्यमातून बंगाली भाषेत त्यांनी साहित्य निर्मिती केली असली तरी त्यांच्या प्रतिभेने स्थळ-काळाची सर्व बंधनें झुगारून वैश्विक स्वरूपाची अजरामर साहित्यसेवा केली. काल, आज आणि कदाचित उद्याही त्यांच्या वाङ्मयावर बंगाली जनता आपला हक्क सांगत राहिली तरी भाषेचे कवच फोडून त्यांचे साहित्य साऱ्या भारतभर विभिन्न भाषांमधून केव्हाच पोचले आहे, आवडीने वाचले जात आहे. मग त्यांच्यावर आम्हीही हक्क सांगावा यात आश्चर्य ते कसले ?

□ □ □

□

## सात

# भारतीय साहित्यनभांतील दोन चंद्र

पाश्चात्त्य जगात ज्या काही भारतीय साहित्यिकांची नावे परिचित आहेत त्यात शरच्चंद्र आणि प्रेमचंद्र ही दोन नावे प्रामुख्याने अंतर्भूत आहेत. कारण दोन्ही कथा–कादंबरीकारांनी दलित आणि उपेक्षित समाजाच्या अंतरंगांचे भेदक आणि प्रत्ययकारी चित्रण केले आहे. दोघेही समकालीन लेखक असले तरी दोन भिन्न भाषांचे कथाप्रभू होते. शरच्चंद्रांनी बंगालीतून आणि प्रेमचंदांनी हिंदुस्थानींतून आपली कथासृष्टी निर्माण केली. परंतु दोघांनाहि समाजाविषयी प्रेम आणि कळवळा वाटत असल्याने भारतीय जीवनाचे अत्यंत मार्मिक व उत्कट दर्शन त्यांनी घडवले आहे. त्यांच्या कथा-कादंबऱ्यांचे केवळ भारतीय भाषांतूनच नव्हे तर अन्य भाषांतूनही अनुवाद झाले असून त्यांचा आस्वाद रसिकांनी सारख्याच तन्मयतेने घेतला आहे. महाराष्ट्रीयांना तर ते आपलेच वाटतात. नव्या वाचकांना जुन्या कादंबऱ्यांबद्दल फारसे आकर्षण वाटत नाही ही गोष्ट सोडा ! आपले मराठी कादंबरीकारही ह्याला अपवाद नाहीत. आम्हा महाराष्ट्रीयांना बंगाली आणि हिंदी भाषांबद्दल आकर्षण वाटत आले असून दिवसेंदिवस ते वाढत

आहे. आणि बंगाली भाषा शिकावी ती प्रामुख्याने रवींद्र आणि शरद् ह्यांचे साहित्य मुळातून आस्वादण्यासाठी व हिंदी शिकावी ती जयशंकरप्रसाद आणि मुन्शी प्रेमचंद ह्यांचे साहित्य मुळातून वाचण्यासाठी, ह्याबद्दल दुमत होणार नाही !

शरच्चंद्र आणि प्रेमचंद ह्या दोघांचेही बालपण अत्यंत हालअपेष्टात गेले. दोघांनाही इच्छा असून उच्च शिक्षणाचा लाभ झाला नाही. दोघांनीही आपल्या वाङ्मयाने समाजाचे उद्‌बोधन आणि रंजन करून समाजसेवा केली. दोघेहि गरिबांचे व स्त्रियांचे कैवारी होते. गंमत अशी की शरदबाबूंना महाराष्ट्रीयांबद्दल आदरमिश्र कौतुक वाटे. त्यांच्या 'पथेर दावी' ह्या कादंबरीत रामदास तळवलकर ह्या नावाचे एक क्रांतिकारी महाराष्ट्रीय पात्रही आहे. प्रेमचंदांनी तर मुंबईत एक वर्ष वास्तव्यच केले. ते अशा परिस्थतीत की महाराष्ट्रीय जीवन आणि समाज ह्यांचा फारसा परिचय त्यांना होऊ शकली नाही. तरीही त्यांना महाराष्ट्राबद्दल आदर असावा !

शरच्चंद्रांचा जन्म दि. १५ सप्टेंबर १८७६ रोजी बंगालमधील देवानंदपूर नावाच्या खेडयात झाला. वडिलांचे नाव मोतीलाल चट्टोपाध्याय होते. हे गृहस्थ साहित्यानुरागी आणि लेखक असले तरी त्यांनी कोणतेच पुस्तक पूर्ण केले नाही. लक्ष्मी आणि सरस्वती ह्यांचे सख्य ( ? ) सर्वश्रुतच आहे. शरच्चंद्र बालपणी हुड आणि विद्याविमुख होते. त्यांचे हायस्कूलपर्यंतचे शिक्षण मजफ्फरपूरला मामांकडे झाले. कॉलेजात नाव दाखल केले खरे पण वार्षिक परिक्षेला बसण्यासाठी लागणारी फी रु. २० न मिळाल्यामुळे त्यांनी शिक्षणाला रामराम ठोकला. २७ व्या वर्षी पितृछत्र नाहीसे झाल्यामुळे परिवाराचा भार त्यांच्या शिरावर आला. कलकत्त्याला एका वकिलाकडे नोकरी करीत असताना त्यांना उबग येऊन ते रंगूनला निघून गेले. तेथे त्यांनी चौदा वर्षे नोकरी केली. कादंबरीकार म्हणून प्रसिद्धी मिळाल्यावर नोकरी सोडून त्यांनी वाङ्मयसेवेला वाहून घेतले. त्यानंतरचे त्यांचे जीवन आर्थिक दृष्टया अत्यंत यशस्वी आणि सुखी झाले. इतके की त्यांनी स्वतःसाठी कलकत्त्यात मोठे घर आणि एक मोटार विकत घेतली. इ. स. १९३८ सालच्या जानेवारीत त्यांचे देहावसान झाले. त्यांचे वैवाहिक जीवन इतके अत्यल्प होते की ते फारसे ज्ञात नाही. शरच्चंद्रांचे बरेचसे जीवन भटकण्यात

गेले. ह्या भ्रमंतीत त्यांना खूप अनुभव मिळाले. त्यांचा भरपूर उपयोग त्यांनी आपल्या कादंबऱ्यात करून घेतला आहे. त्यांनी सुमारे तीन डझन कादंबऱ्या लिहिल्या व त्या सर्वच सामाजिक आहेत. बहुतेक सर्वच कादंबऱ्या स्त्रीप्रधान आहेत हे विशेष. त्यांच्या कादंबऱ्यांनी बंगालमधील नव्हे तर भारतातील स्त्रियांना पुरुषांच्या गुलामगिरीतून मुक्त होण्याची प्रेरणा दिली आहे.

शरच्चंद्रांचे जीवित सुमारे एकसष्ट वर्षांचे तर प्रेमचंदांचे आयुष्य अवघे छपन्न वर्षांचे; तथापि एवढ्या आयुष्यातही प्रेमचंदांनी केलेली साहित्य-सेवा अपूर्व आणि अतुलनीय आहे. प्रेमचंदांचा जन्म दि. ३१ जुलै १८८० रोजी बनारसजवळच्या एका खेड्यात झाला. त्यांचे वडील अजाबराय हे साधे कारकून होते. अर्थात घरात दारिद्र्य होते हे सांगण्याची गरज नाही. प्रेमचंदांचे जन्मनाव धनपतराय असून काका त्यांना नवाबराय म्हणत. प्रत्यक्षात त्यांना एकही नाव सार्थ करता आले नाही ही गोष्ट वेगळी. प्रेम-चंद हे त्यांचे टोपणनाव असले तरी तेच सर्वश्रुत व सार्थ आहे. त्यांनी धुळा-क्षरे गिरवली उर्दूची आणि सुरुवातीला लेखन केले तेही उर्दूतच. पुढे एका स्नेह्याच्या प्रेरणेने आणि प्रोत्साहनाने त्यांनी हिंदी लिहिले. हायस्कूलपर्यंतचे शिक्षण बनारसला झाले. गणिताशी त्यांचा छत्तिसाचा आकडा होता. गणित हा ऐच्छिक विषय झाल्यावरच त इंटर झाले. त्यांच्या वाङ्मयावर प्रबंध लिहून अनेकांनी उच्च पदव्या प्राप्त केल्या असल्या तरी प्रेमचंदांना मात्र पदवी प्राप्त करून घेता आली नाही. त्यांचे जीवन अत्यंत धकाधकीचे व अस्थिर होते, आणि त्याच्याशी सामना करण्याइतपत त्यांचे शरीर सुदृढ आणि स्वस्थ नव्हते. तरीही त्यांनी अखंड साहित्यसेवा केली. किंबहुना हिंदी कादंबरीच्या जनकत्वाचा मान त्यांच्याकडेच जातो. १९३६ सालच्या ऑक्टो-बरात त्यांचा देहान्त झाला. प्रेमचंदांनी फक्त अकराच कादंबऱ्या लिहिल्या असल्या तरी त्यांचे कार्य अमूल्य आहे. प्रेमचंदांच्या कादंबऱ्या पुरुषप्रधान आहेत. त्यांच्यावर आर्थिक समस्यांचा प्रभाव पडलेला दिसतो तरीसुद्धा त्यांच्या वाङ्मयाच्या वाचनाने धनिकांबद्दलही तिरस्कार न वाटता अनुकंपा वाटते.

शरच्चंद्रांनी आपली पहिली कादंबरी अठराव्या वर्षी लिहिली तर प्रेमचंदांनी विसाव्या वर्षी. शरच्चंद्रांच्या काळी बंगाली भाषेत रवींद्रनाथ सामाजिक कादंबऱ्या लिहीत होते. रवींद्र हाडाचे कवि आणि सौंदर्यवादी असले तरी त्यांच्या कादंबऱ्या वास्तवपूर्ण आहेत. कवितेबद्दल शरच्चंद्रांच्या मनातही अनुराग असला तरी त्यांची प्रतिभा गद्यानुकूल होती. तरीही त्यांची भाषा आणि वातावरण काव्यमय असल्याचा प्रत्यय आल्याखेरीज रहात नाही. रवींद्रांच्या शैलीचा परिणाम आपल्या शैलीवर झाला आहे असे प्रेमचंदांनी बनारसीदास चतुर्वेदींना सांगितले आहे. बंकिमचंद्रांच्या बंगाली कादंबऱ्या शरच्चंद्रांनी युवावस्थेत वाचल्या आणि प्रेमचंदांनी त्यांचे अनुवाद आपल्या युवावस्थेत वाचले. मात्र त्यांचा परिणाम दोघांवरही झालेला दिसत नाही. सुरुवातीला शरदबाबूंनी थॅकरे व डिकन्स हे पाश्चात्त्य कादंबरीकार वाचले आणि मेरी कॉरेली व हेन्री वुडच्या कादंबऱ्यांचा प्रत्येकी एकेक अनुवाद केला; परंतु ते अनुवाद कधीही प्रकाशित झाले नाहीत. उलट प्रेमचंदांना टॉलस्टॉय आणि गोर्की ह्यांनी इतके प्रभावित केले की काही कथांचे त्यांनी अनुवाद करून प्रकाशितही केले. तरीही त्यांची शैली स्वतंत्रच राहिली. त्यांनी हिंदी कथा–कादंबरीला अद्भुताकडून वास्तवाकडे वळविण्याचे कार्य केले.

जीवित आणि जग ह्यांचे कटु अनुभव उभयतांनी भरपूर घेतले. तरीही जीवनाशी तडजोड करून त्यांनी आपल्या वाङ्मयांतून जीवनाचे मंगल दर्शन घडवले. दोघेही मध्यमवर्गीय असल्यामुळे त्यांनी मध्यम वर्गीयांचे चित्रण अत्यंत तन्मयतेने आणि तत्परतेने केले आहे. धनिकांनी दोघांच्याही वाङ्मयसृष्टीत प्रवेश केला आहे, तथापि त्यांच्या पापाचा पाढा जसा आणि जितका प्रेमचंदांनी वाचला तेवढा शरच्चंद्रांनी वाचला नाही. मात्र प्रेमचंदांनी धनिकांचे चित्रण करतानाही त्यांच्याबद्दल सहानुभाव निर्माण केला. जसा प्रेमचंदांनी धनिकांबद्दल सहानुभाव निर्माण केला तसाच शरदचंद्रांनी पतितांबद्दल. दोघांच्याही वाङ्मयात एकच सूत्र दिसून येते आणि ते असे की पापाबद्दल घृणा बाळगावी, मात्र पाप्याबद्दल अनुकंपा असावी. त्यामुळेच प्रेमचंदांनी धनिकांचे चित्रण अशा खुबीने केले आहे की, त्यांनी क्रोधित होण्याऐवजी लज्जित व्हावे.

दोघेही आदर्शवादी वास्तवाचे पुरस्कर्ते असल्याचे त्यांच्या साहित्यावरून स्पष्ट होते. तरीही दोघांच्या जीवनविषयक दृष्टिकोनात फरक आहे. शरच्चंद्रांच्या कादंबऱ्यांतून धनिक विरुद्ध गरीब, मालक विरुद्ध मजूर हा संघर्ष दिसत नाही. उलट प्रेमचंदांच्या कादंबऱ्यांतून हा संघर्ष उत्कटतेने व उत्कृष्टतेने मांडलेला दिसून येतो. शरच्चंद्रांच्या कादंबऱ्यांचे नायक आपल्याच सुखदुःखात चूर दिसतात. तसे प्रेमचंदांच्या कादंबऱ्यांत नाही. तसे दोघेही समाजप्रेमी आणि समाजसेवक होते. देशात सुरू असलेल्या ब्रिटिशविरोधी काँग्रेस चळवळीबद्दल दोघांनाही आकर्षण वाटत होते. शरच्चंद्र एक वर्ष हावरा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष होते. प्रेमचंदांनी त्यांच्यावर ताण केली. असहकाराच्या चळवळीत सरकारी नोकरीचा त्याग करून त्यांनी काँग्रेसकार्यात भाग घेतला. मात्र गांधीवादाचा परिणाम जसा प्रेमचंदांच्या वाङ्मयावर झालेला दिसतो तसा शरच्चंद्रांवर दिसत नाही. शरच्चंद्रांच्या 'पाथेर दाबी' ह्या कादंबरीत क्रांतिकारकांचे चित्रण त्यांनी आत्मीयतेने केले आहे. बंगालचे ते एक वैशिष्ट्य सांगता येईल.

शरच्चंद्रांची 'चरित्रहीन' ही सर्वांत मोठी आणि त्यांच्या लेखनाची सर्व वैशिष्ट्ये व्यक्त करणारी कादंबरी आहे, परंतु त्यांच्या 'देवदास', 'श्रीकांत', 'बडी दिदी' आणि 'पाथेर दाबी' ह्या कादंबऱ्या फार लोकप्रिय आहेत. आपल्या कादंबऱ्यांचे वैशिष्ट्य म्हणा की वैगुण्य, सांगताना ते म्हणतात– "माझ्या कादंबऱ्यांतून मानवाच्या दुःखाचे दर्शन आहे, काही समस्याही असतील; मात्र त्यांचे निरसन आढळणार नाही." आपल्या सामाजिक दृष्टिकोणाविषयी आणखीही एक स्पष्टीकरण त्यांनी दिले आहे. त्यांच्या मते समाज स्त्रीपुरुष-प्रेमाच्या बाबतीत अत्यंत निर्दय आहे. तरीही त्याने पुरुषाला सवलत दिली आहे. तो स्त्रीला फसवून जाऊ शकतो. शेवटी भोग येतो तो स्त्रीच्या नशिबी. ह्या अन्यायाला वाचा फोडण्याचे काम साहित्यिकांचे आहे. हीच श्रद्धा व निष्ठा उराशी बाळगून शरदबाबूंनी आपली साहित्यसृष्टि निर्माण केली.

प्रेमचंदांची 'गोदान' ही सर्वोत्कृष्ट कादंबरी समजली जाते. ते एक भारतीय शेतकऱ्याच्या जीवनावरील महाकाव्य असे समजण्यात येते. त्यांच्या कादंबऱ्यांतून मजूर आणि शेतकरी ह्यांच्या दैन्याचे, दुःखाचे व दारिद्र्याचे

ग्रंथालय
शाखा (स्थळ प्रत)

वर्णन अगदी कळवळून केलेले आढळते. ते स्वतःला मजूर म्हणवीत आणि एखाद्या शेतकऱ्याप्रमाणे साधेपणाने राहात. मात्र वृत्ति मोठी खंबीर असे. ते म्हणत– " सर्वांची मर्जी सांभाळून लिहिणारा तो लेखक कसला ? सरकार तुरुंगात टाकील आणि समाज वाळीत टाकील म्हणून लेखकाने लिहिणे बंद करावे काय ?" प्रेमचंदांचा कल साम्यवादाकडे होता. मात्र त्यातही समजूतदारपणा होता, तडजोड होती. त्यामुळेच त्यांना गांधीवाद रुचला व पचवता आला; तोही इतका की गांधींच्या युगाचा ज्वलंत इतिहास त्यांनी आपल्या कादंबऱ्यांतून ग्रथित केला आहे.

प्रेमचंदांना बंगाली साहित्याबद्दल आदर वाटत असला तरी, त्यांत अधिक भावुकता व स्त्रैणता आहे, अशी त्यांची धारणा होती. त्यांच्या दृष्टीने बंगाली वाङ्मयात भावनेची तरलता असून हिंदीत तिच्या ऐवजी भावनेची कठीणता असावी असे त्यांना वाटे. शरच्चंद्र महान आहेत असे ते समजत व म्हणत. तरीही त्यांचा कित्ता गिरविण्याची इच्छा आणि आकांक्षा त्यांच्या मनात कधीच उत्पन्न झाली नाही. तात्पर्य आपल्या भाषेची व प्रांताची अस्मिता त्यांनी जोपासली. तरीही पारतंत्र्यात जगल्याने त्यांच्या वाङ्मयाला काही मर्यादा न कळतच पडल्या आहेत. तसे पाहता उभयतांच्या कादंबऱ्यांत वैश्विकतेचा साक्षात्कार होतो. मात्र स्वतंत्र भारतात ते असते तर कदाचित् आहे त्याहून त्यांचे साहित्य अधिक तेजस्वी झाले असते,

भारताच्या साहित्यनभातील ह्या दोन चंद्रांनी आपापल्या परीने जी अपूर्व आणि संस्मरणीय कामगिरी बजावली आहे, तिचा विसर भारतीयांना कधीही पडू शकणार नाही !

□ □ □

□

आठ

# हरिभाऊ आणि शरच्चंद्र

साहित्य आणि साहित्यिक यांची तुलना करणे अन्याय्य आहे. धर्म आणि संस्कृति, इतिहास आणि परंपरा, प्रज्ञा आणि पांडित्य, परिस्थिती आणि भावनाक्षमता इ. अनेक गोष्टींमुळे साहित्यिकांच्या मनोधर्मात आणि आविष्कारपद्धतीत जसा फरक पडतो तसा साहित्याच्या स्वभावात व स्वरूपात बदल पडतो. म्हणूनच त्यांची तुलना न करणेच बरे. निदान एकाला श्रेष्ठ आणि दुसऱ्याला कनिष्ठ लेखणे अयोग्यच होय. सबब प्रस्तुत लेखात महाराष्ट्राचे थोर कादंबरीकार हरिभाऊ आपटे आणि बंगालचे थोर कादंबरीकार शरच्चंद्र चटोपाध्याय यांच्या सामाजिक कादंबरीतील वैशिष्टचे आणि तदनुषंगाने त्यांतील साम्य व वैषम्य दाखवूनच मी थांबणार आहे.

महाराष्ट्र आणि बंगाल हे प्रांत साहित्यक्षेत्रात आघाडीवर असल्याचे बोलले जाते. त्यात सत्यांश आहे यात शंकाच नाही. कदाचित काही बाबतीत बंगाल महाराष्ट्राला मागेही टाकील. तसे मानावयाला कारणेही आहेत. हा विवाद्य भाग सोडला तर कादंबरीच्या क्षेत्रात आघाडीवर असलेले, नव्हे अमर झालेले, अनुक्रमे महाराष्ट्र आणि बंगाल यातील हरिभाऊ

वर्णन अगदी कळवळून केलेले आढळते. ते स्वत:ला मजूर म्हणवीत आणि एखाद्या शेतकऱ्याप्रमाणे साधेपणाने राहात. मात्र वृत्ति मोठी खंबीर असे. ते म्हणत– " सर्वांची मर्जी सांभाळून लिहिणारा तो लेखक कसला ? सरकार तुरुंगात टाकील आणि समाज वाळीत टाकील म्हणून लेखकाने लिहिणे बंद करावे काय ?" प्रेमचंदांचा कल साम्यवादाकडे होता. मात्र त्यातही समजूतदारपणा होता, तडजोड होती. त्यामुळेच त्यांना गांधीवाद रुचला व पचवता आला; तोही इतका की गांधींच्या युगाचा ज्वलंत इतिहास त्यांनी आपल्या कादंबऱ्यांतून ग्रथित केला आहे.

प्रेमचंदांना बंगाली साहित्याबद्दल आदर वाटत असला तरी, त्यांत अधिक भावुकता व स्त्रैणता आहे, अशी त्यांची धारणा होती. त्यांच्या दृष्टीने बंगाली वाङ्मयात भावनेची तरलता असून हिंदीत तिच्या ऐवजी भावनेची कठीणता असावी असे त्यांना वाटे. शरच्चंद्र महान आहेत असे ते समजत व म्हणत. तरीही त्यांचा कित्ता गिरविण्याची इच्छा आणि आकांक्षा त्यांच्या मनात कधीच उत्पन्न झाली नाही. तात्पर्य आपल्या भाषेची व प्रांताची अस्मिता त्यांनी जोपासली. तरीही पारतंत्र्यात जगल्याने त्यांच्या वाङ्मयाला काही मर्यादा न कळतच पडल्या आहेत. तसे पाहता उभयतांच्या कादंबऱ्यांत वैश्विकतेचा साक्षात्कार होतो. मात्र स्वतंत्र भारतात ते असते तर कदाचित् आहे त्याहून त्यांचे साहित्य अधिक तेजस्वी झाले असते,

भारताच्या साहित्यनभातील ह्या दोन चंद्रांनी आपापल्या परीने जी अपूर्व आणि संस्मरणीय कामगिरी बजावली आहे, तिचा विसर भारतीयांना कधीही पडू शकणार नाही !

□ □ □

□

# आठ

## हरिभाऊ आणि शरच्चंद्र

साहित्य आणि साहित्यिक यांची तुलना करणे अन्याय्य आहे. धर्म आणि संस्कृति, इतिहास आणि परंपरा, प्रज्ञा आणि पांडित्य, परिस्थिती आणि भावनाक्षमता इ. अनेक गोष्टींमुळे साहित्यिकांच्या मनोधर्मात आणि आविष्कारपद्धतीत जसा फरक पडतो तसा साहित्याच्या स्वभावात व स्वरूपात बदल पडतो. म्हणूनच त्यांची तुलना न करणेच बरे. निदान एकाला श्रेष्ठ आणि दुसऱ्याला कनिष्ठ लेखणे अयोग्यच होय. सबब प्रस्तुत लेखात महाराष्ट्राचे थोर कादंबरीकार हरिभाऊ आपटे आणि बंगालचे थोर कादंबरीकार शरच्चंद्र चटोपाध्याय यांच्या सामाजिक कादंबरीतील वैशिष्टचे आणि तदनुषंगाने त्यांतील साम्य व वैषम्य दाखवूनच मी थांबणार आहे.

महाराष्ट्र आणि बंगाल हे प्रांत साहित्यक्षेत्रात आघाडीवर असल्याचे बोलले जाते. त्यात सत्यांश आहे यात शंकाच नाही. कदाचित काही बाबतीत बंगाल महाराष्ट्राला मागेही टाकील. तसे मानावयाला कारणेही आहेत. हा विवाद्य भाग सोडला तर कादंबरीच्या क्षेत्रात आघाडीवर असलेले, नव्हे अमर झालेले, अनुक्रमे महाराष्ट्र आणि बंगाल यातील हरिभाऊ

आणि शरच्चंद्र हेच कादंबरीकार होत. महाराष्ट्राने हरिभाऊंची जन्मशताब्दी साजरी केली (१९६४). शरच्चंद्रांची जन्मशताब्दी यंदा साजरी होत आहे, ( १९७६ ). शरच्चंद्रांची जन्मशताब्दी साऱ्या भारतात साजरी केली जात आहे आणि सारा भारतवर्ष त्या कार्यक्रमात भाग घेत आहे. भारतातील अन्यान्य भाषांत शरच्चंद्रांच्या कादंबऱ्या अनुवादाच्या स्वरूपात अवतीर्ण झाल्या असून वाचल्या गेल्या आहेत. एवढेच नव्हे तर कौटुंबिक स्वरूपाच्या त्यांच्या कादंबऱ्यांनी हजारो वाचकांना वेडावून सोडले आहे. मानवी भावना देशकालातीत असल्याने एका साहित्यिकाचे साहित्य अन्याय भागातील व काळातील वाचकांना आवडले तर त्यात नवल नाही. हरिभाऊंच्या कादंबऱ्याही कदाचित् बंगाली वाचकांना आवडल्या असत्या. दुर्दैवाने त्यांचा अनुवाद बंगालीत झालेला नाही. शरच्चंद्रांचा परिचय मराठी वाचकांना असल्याने त्यांच्या कादंबऱ्यांविषयी त्यांना काही ऐकवणे फारसे चूक होणार नाही.

हरिभाऊंनी केवळ दहाच सामाजिक कादंबऱ्या लिहिल्या ( आणि अकरा ऐतिहासिक लिहिल्या ) तर शरच्चंद्रांनी तीस सामाजिक लिहिल्या. परंतु विचार करायला हवा तो गुणवत्तेच्या दृष्टीने, संख्येच्या नव्हे. उभयतांच्या कादंबऱ्या कौटुंबिक स्वरूपाच्या आहेत. तथापि हरिभाऊंच्या कादंबऱ्या जशा समस्याप्रधान आहेत, तशा शरच्चंद्रांच्या नाहीत. उभयतांनी जीवदनर्शन घडवले; मात्र हरिभाऊ केवळ जीवनदर्शन घडवून थांबत नाहीत, त्यातून स्त्रियांवर होणारा अन्याय, त्यांना होणारा छळ, त्यांची केली जाणारी उपेक्षा यांचे सावेश प्रदर्शन मांडतात. महाराष्ट्रीय स्त्रियांना शिक्षण देऊन त्याची स्थिती सुधारली पाहिजे हा त्यांच्या प्रतिपादनामागील प्रमुख हेतु असतो. त्या अनुषंगाने विभिन्न विषय येतात. या विषयांच्या अनुरोधाने महाराष्ट्रीय मध्यमवर्गीय समाजातील ज्या व्यक्तिरेखा त्यांनी उभ्या केल्या त्या मात्र वास्तव, प्रातिनिधिक व मनोवेधक आहेत. हे सर्व लोक पुण्यात राहणारे आहेत. मुंबई सोडून इतरत्र ते फारसे जात नाहीत. त्यातही दोन पक्ष दिसतात. काही सनातनी तर काही सुधारक. पुरुषांप्रमाणेच काही स्त्रिया अशिक्षित तर काही शिक्षित असतात. तरीही त्या माजघराच्यापुढे फारसे पाऊल टाकीत नाहीत. त्या सुगृहिणी असतात. त्यांच्या कर्तृत्वाला

फारसा वाव नाही. याउलट शरच्चंद्रांच्या मानसकन्या कर्तृत्ववान आहेत ज्यांच्या कर्तृत्वाला वाव नाही त्या देखील आपल्या व्यक्तित्वाचा वाचकां-वर असा काही ठसा उमटवून जातात की त्यांचा वाचकांना विसर पडणे केवळ अशक्य. हरिभाऊ कौटुंबिक जीवन रंगवीत असले तरी आई–मुलगा बहिण–भाऊ, दीर–भावजयी, असल्या कौटुंबिक नात्यातील माधुर्य, भक्ति-वात्सल्य, प्रेम यांचा त्यांच्या वाङ्मयसृष्टीत अभावच आढळतो. शरच्चंद्रांच्या भावसृष्टीत याचा सुकाळ आढळतो. किंबहुना, त्यामुळे मांगल्य, उदात्तता, कारुण्य यांनी वाचकांचे मन भारावून जाते. शरच्चंद्रांच्या कादंबऱ्यांत सावत्र मुलावर जिवापाड प्रेम करणाऱ्या माता आहेत. दिरावर मुलाप्रमाणे प्रेम करणाऱ्या वहिनी आहेत. त्यांच्या वाङ्मयसष्टीत कर्कशा दिसत नाहीत. ज्या आहेत त्या सर्व प्रेममूर्ती, वासल्यसिंधू आहेत. खरोखरीच शरच्चंद्रांची साहित्यसृष्टी बंगाल्यातील वास्तव सृष्टी असेल तर बंगाल हा केवळ साहित्यातच नव्हे तर संस्कृतीतही महाराष्ट्राच्या कितीतरी पुढे आहे हे कोणालाही नाकबूल करता येणार नाही.

हरिभाऊंचे जग हे महाराष्ट्रातील, विशेषतः पुण्यातील ब्राह्मणवर्गाचे जग आहे. सनातनी व सुधारकांचे जग आहे. ज्या काळात ( इ. स. १८८५ ते १९०५) हरिभाऊंनी आपल्या सामाजिक कादंबऱ्या लिहिल्या त्या काळात पुण्यात आणि बऱ्याच प्रमाणात महाराष्ट्रातसुद्धा आगरकरांच्या प्रभावाने सुशिक्षित ब्राह्मणसमाजात सुधारणेचा श्रीगणेशा होऊ लागला होता. तरुण-पिढीला सुधारणेचे वेड तर जुन्या पिढीला तिचे वावडे. या समाजसुधारणेच्या कल्पनेत स्त्रीशिक्षण ही प्रमुख बाब होती. रूढिप्रिय समाजात, एकत्र कुटुं-बात जो स्त्रियांचा व विशेष करून तरुण विधवांचा छळ होत होता तो नाहीसा व्हावा, केशवपनाला आळा बसावा, पुनर्विवाहाला प्रोत्साहन मिळावे, यांसारख्या सामाजिक समस्या सुधारकांच्या पुढे होत्या. हरिभाऊंनी आपल्या वाङ्मयसृष्टीतून अत्यंत रसोत्कट व आवेशयुक्त भाषेत या कल्पनांचा पुरस्कार केला. तत्कालीन राजकारण आणि समाजकारण यांचा आलेख जरी हरिभाऊंच्या सामाजिक कादंबऱ्यांतून वाचकांच्या पुढे येत असला तरी त्यांचा गाभा म्हणजेच सामाजिक सुधारणा. हा सुधारणावाद हरिभाऊ यांना रुचला पण पचला नाही, ही वस्तुस्थिती आहे. साहजिकच हरिभाऊंचे

जीवन आणि वाङ्मय ( सामाजिक कादंबऱ्या ) यात कमालीची तफावत आहे. तसे शरच्चंद्रांचे नाही. ते ज्याप्रकारचे जीवन जगले त्याचप्रकारचे वाङ्मयीन जीवन त्यांनी चित्रित केले. श्रीकांत (श्रीकांत), देवदास, (देवदास), सुरेश (गृहदाह) हे त्यांचे नायक थोडयाफार प्रमाणात त्यांचीच प्रतिबिंबे आहेत. तथापि, त्यांच्या कादंबऱ्या अधिकतर स्त्रीप्रधान आहेत. त्यात घरंदाज स्त्रियांप्रमाणेच पतिताही आहेत. परंतु त्यांच्या पतिता उच्छृंखल नसून सोज्वल आहेत. राजलक्ष्मी (श्रीकांत) व चंद्रमुखी ( देवदास ) या अशाच पतिता आहेत. घरंदाज स्त्रियात जी निरनिराळी नाती त्यांनी चित्रित केली आहेत त्यात ओतप्रोत माधुर्य, वात्सल्य, संयम व्यक्त झाले आहेत. महाराष्ट्राप्रमाणेच बंगाल हा सनातनी विचारांचा प्रांत आहे. स्त्रियांची स्थिती तेथेही महाराष्ट्रासारखीच आहे. त्यांच्या मूक भावनांना शरदच्चंद्रांनी वाचा फोडली. तेच महाराष्ट्रात हरिभाऊंनी केले. तथापि, शरच्चंद्रांनी विविध थरांतील स्त्रियांची दुःखे जशी सहानुभूतिपूर्वक रंगवली तशीच त्यांची मानससृष्टी मनोवेधकपणे साकार केली. हरिभाऊंना महाराष्ट्रीय स्त्रियांनी मानपत्र दिल्याचे ऐकिवात नाही. शरच्चंद्रांनी मात्र तो मान मिळवला. यावरून त्यांच्या कादंबऱ्यांतील नारीचित्रणाचा प्रभाव बंगाली स्त्रीसमाजावर केवढा पडला असावा याची स्पष्ट कल्पना येते. शरच्चंद्रांच्या स्त्रिया समाजाच्या विविध थरांतील आहेत. ‘ चरित्रहीन ’ मधील सावित्री एका खाणावळीतील मोलकरीण आहे. ‘श्रीकांत ’ मधील अन्नदा एका गारुडयाची बायको आहे. ‘ भारती ’ एक ख्रिश्चन मुलगी आहे. ‘ श्रीकांत ’ मधीलच अभया आणि राजलक्ष्मी या भिन्न प्रकारच्या स्त्रिया आहेत. काही शिक्षित आहेत तर काही अशिक्षित. काही परंपराप्रिय तर काही परंपराविरोधी. काही बंडखोर तर काही सहनशील. ही विविधता हरिभाऊंच्या वाङ्मयसृष्टीत दिसून येत नाही. याला कारण अनुभूतीची मर्यादितता आणि विशालता हेच असावे.

शरच्चंद्रांच्या वाङ्मयसृष्टीत ब्रह्मदेशालाही बंगाल इतकेच स्थान आहे. त्यांनी ब्रह्मदेशात चौदा वर्षे घालविली. या काळात ‘ ब्रह्मदेशातील भारतीयांचे जे दरिद्री आणि दुःखी जीवन जवळून न्याहाळले त्याचे सम्यक दर्शन घडविले आहे. ‘ श्रीकांत ’ आणि ‘ पथेरदावी ’ दा कादंबऱ्यांतून ब्रह्म-

देशातील भारतीयांचे वास्तव व हळूवार दर्शन आहे. तसा प्रकार हरिभाऊंच्या बाबतीत शक्यच नव्हता. हरिभाऊंनी जरी बराच प्रवास केला असला तरी त्यांचे अधिकात अधिक वास्तव्य पुण्यातच असल्याने त्या पुण्यनगरीलाच त्यांनी आपली वाङ्मयीन कर्मभूमि बनविली आहे. किंबहुना पुण्याबाहेरच्या ग्रामीण महाराष्ट्राचेही दर्शन त्यांनी घडविले नाही. यात जरी त्यांच्या अनुभूतीचा प्रामाणिकपणा व्यक्त होत असला तरी तिच्या मर्यादांचा संकोच सहज लक्षात येतो आणि मनाला विषाद वाटतो.

तसे पाहिल्यास शरच्चंद्रांप्रमाणेच हरिभाऊंची बहुतेक पात्रे ब्राह्मण समाजातील आहेत. तत्कालीन ब्राह्मण समाज हा सनातनी होता. त्यातील चालीरीती, रूढिपरंपरा जुनाट व तापदायक होत्या. या परिस्थितीचे प्रतिबिंब उभयतांच्या साहित्यसृष्टीत पाहावयास सांपडते. हरिभाऊ जेवढे समाजसुधारक तेवढेच शरच्चंद्रही होते; तथापि, हरिभाऊंनी रंगवलेल्या समस्या शरच्चंद्रांनी रंगविलेल्या समस्यांहून अगदी वेगळ्या आहेत. विधवांचे पतित व दुःखी जीवन, जरठ कुमारी विवाह, बालविवाह, पुनर्विवाहाला विरोध, स्त्रीशिक्षणविरोध, या हरिभाऊंच्या प्रमुख समस्या आहेत. शरच्चंद्रांना या गोष्टी का जाणवल्या नाहीत हे कळत नाही. जातिभेदाचा प्रश्न त्यांनी क्वचित् उपस्थित केला आहे. पतितांचा प्रश्न त्यांना जाणवला आहे. हुंड्याचीही समस्या त्यांनी चर्चिली आहे. त्यांच्या कादंबऱ्यांतील पतिता इतक्या सोज्वळ आणि सज्जन आहेत की, त्यांच्याबद्दल तिरस्कार वाटण्याऐवजी सहानुभूती वाटते. उलट हरिभाऊंनी क्वचित् ज्यांचा उल्लेख केला आहे त्याची चीड येते. (मधली स्थिती) शरच्चंद्रांच्या मानसकन्यांचे प्रश्न सामाजिक नाहीत, कौटुंबिक आहेत. त्यांच्याबद्दल दया किंवा करुणा वाटण्याऐवजी आदर वाटतो. त्यांच्यावर अन्याय होत नाहीत असे नाही; पण अन्याय करणारी व्यक्ती क्रूर वाटत नसून परिस्थितीची गुलाम वाटते. तिचा राग येण्याऐवजी कींव वाटते. शरच्चंद्रांच्या कादंबऱ्यांत खलपुरुष नाहीत, तामसी स्त्रिया नाहीत, तरी कादंबऱ्यांची पकड कमी होत नाही. जो बाह्य संघर्ष हरिभाऊंच्या कादंबऱ्यात दिसतो त्याचा लवलेश शरच्चंद्रांत नाही, कुठे अतिरेक आहे असे वाटत नाही. शरच्चंद्रांत कमालीचा संयम आहे. प्रेम आणि वात्सल्य यांचे अपूर्व चित्रण त्यांच्या वाङ्मयात

आढळते. तथापि, प्रणयाचा अवखळपणा व शृंगाराचा अतिरेक कुठेच दिसत नाही. हरिभाऊत ते आहे असा मात्र त्याचा अर्थ नव्हे. तरीहि हरिभाऊ काही व्यक्ती भडक रंगात रंगवतात तसा प्रकार शरदबाबूंचा नाही.

हरिभाऊंत व्यक्तिनिरपेक्षता ( Objectivity ) फार आहे. शरच्चंद्रांत ती तेवढ्या प्रमाणात दिसून येत नाही. 'श्रीकांत' 'चरित्रहीन' आणि 'देवदास' ही त्यांची आत्मचरित्रे वाटतात. 'श्रीकांत' मधील 'कुमारसाहेब' 'इंद्रनाथ' 'राजलक्ष्मी' या व्यक्ती त्यांच्या आयुष्यांत आल्याचे त्यांचे चरित्रकार नावानिशी सांगतात. देवदासच्या पूर्वार्धात म्हणे त्यांनी आपले आत्मचरित्र रेखाटले आहे. स्वतः केलेल्या ब्रह्मदेशच्या प्रवासाचे वर्णनही असेच कल्पित नसून स्वानुभवावर आधारलेले आहे. असे असले तरी अन्यत्र मात्र शरच्चंद्र कमालीच्या व्यक्तिनिरपेक्षतेने लिहिताना आढळतात. हरिभाऊ जसे पुण्याचे वर्णन करताना तत्कालीन व्यक्तींची हुबेहूब चित्रे काढतात, तसेच शरच्चंद्र काही ठिकाणी वास्तवाचा पुरेपूर उपयोग करतात. अन्यत्र मात्र हरिभाऊं-प्रमाणेच ते व्यक्तिनिरपेक्षता दाखवितात. फरक आहे तो एवढाच की, हरिभाऊ वाचकांच्या बरोबर राहून आपली व्यक्तिनिरपेक्षता व्यक्त करतात तर शरच्चंद्र वाचकांची पात्रांशी गाठ घालून देऊन गायब होऊन जातात. मग ते शोधून सापडणार नाहीत.

हरिभाऊ आणि शरच्चंद्र यांच्या जीवनात खूप फरक होता. साम्य एकाच गोष्टीत दिसते. ते असे की, दोघांनाही पदवी घेण्यात यश मिळाले नाही. हरिभाऊंनी कमालीची विद्वत्ता संपादन केली तरी त्यांना विद्यापीठा-कडून सन्मान्य पदवीही मिळाली नाही. उलट शरच्चंद्रांना डाक्का विद्यापीठाने 'डॉक्टर' ही सामान्य उपाधि दिली व त्यांचा गौरव केला. महाराष्ट्रातील विद्वानांचा अन्यत्रच गौरव होत आला आहे. ही परंपरा अजूनही खंडित झालेली नाही. हरिभाऊंचे बालपण मातृविहीन असूनही सुखात गेले, गणितविषयाशी सख्य न जुळल्यामुळे त्यांनी पदवीचा नाद सोडला एवढेच. एरव्ही त्यांना वाचनाचे वेड होते, विद्येविषयी ओढ होती. शरच्चंद्र बालपणी उनाड होते. ऐन तारुण्यात साधू बनून भ्रमणहि केले. तरीही मॅट्रिक पास होऊन त्यांनी थोडे दिवस कॉलेजजीवनाचा अनुभव

घतला. वडिलांच्या मृत्यूनंतर घराचा सर्व भार त्यांच्यावरच होता. त्यामुळे उदरनिर्वाहासाठी मिळेल ती नोकरी त्यांनी केली. ब्रह्मदेशात जाऊन राहिले. साहजिकच त्यांच्या अनुभवाचे क्षेत्र विविधतेने भरून विस्तारले. ब्रह्मदेशातच त्यांनी कादंबरीलेखनाला प्रारंभ केला. प्रकाशकांच्या मागणीवरून त्यांनी लेखन केले. हरिभाऊंनी देखील करमणूक पत्रासाठीच लिहिले.

शरच्चंद्र आणि हरिभाऊ यांच्या कथनपद्धतीत फार फरक आहे. हरिभाऊंच्या कादंबऱ्यात उपकथानके येतात. तसा प्रकार शरच्चंद्रांच्या कादंबऱ्यांत नाही. एकच कथानक अगदी सहजपणे विकसित करून दाखवण्यात शरच्चंद्रांचा हातखंडा आहे. हा विकास व्यक्तींच्या वृत्तीतून व कृतीतून अलगद घडून येतो. रहस्य अगर नाटच यांचा त्या कथेत अभाव आहे. अर्थात् अधुन-मधून योगायोग आहेत, नाही असे नाही. योगायोगातही अशक्यता फार कमी. हरिभाऊंचे तसे नाही. एकच सूत्र घेऊन कथालेखन त्यांना जमत नसावे. कथनावर त्यांचा भर फार. संवाद त्या मानाने कमीच संवादातून कथा फुलवावी ती शरच्चंद्रांनीच. दोघांच्याही कादंबऱ्यांत कारुण्याला प्राधान्य असले तरी ते निर्माण करण्याच्या पद्धती वेगळ्या आहेत. संकटे आणि पीडा यांच्या आधारे हरिभाऊ कारुण्य निर्माण करतात, तर उदात्ततेचे दर्शन घडवून शरच्चंद्र कारुण्य निर्माण करतात. हरिभाऊ संग्रामाचे विविध प्रकार अवलंबितात तर शरच्चंद्र केवळ मानसिक संग्राम चितारतात.

शरच्चंद्रांनी काही सामाजिक समस्या उपस्थित केल्या, परंतु त्या अनिर्णित आहेत. त्यांनी कलेला व्यासपीठ बनविले नाही. हरिभाऊंनी मात्र समाजपरिवर्तन आणि लोकजागृती हे आपले लक्ष ठरविल्यामुळे त्यांच्या कादंबऱ्यांना काही प्रमाणात प्रचारकी स्वरूप आले आहे. ' पण लक्षात कोण घेतो ' मध्ये यमूच्या निवेदनात जो प्रचारकी थाट आला आहे त्याचे विवेचन करण्याची गरज नाही. उलट वाममार्गाला लागलेल्या स्त्रियांचे चित्रण करतानादेखील शरच्चंद्र केवळ त्यांच्या विषयीची सहानुभूती जागृत करतात, त्यांच्या उद्धारासाठी व्याख्यान देत नाहीत. जें समाजकारणाविषयी तेच राजकारणाविषयी सांगता येईल. हरिभाऊंच्या ' यशवंतराव खरे ' ' मी ' यांसारख्या कादंबऱ्यांतून त्यांनी राजकीय विचारांचा ऊहापोह केला.

आहे. मवाळ आणि जहाल पक्षांच्या विचारसरणी मांडल्या आहेत. तसा प्रकार शरच्चंद्रात नाही. त्यांनी 'पथेरदाबी' मध्ये सव्यसाची आणि त्याचा क्रांतिकारीपक्ष चितारला पण त्यांच्याद्वारे चर्चा केली नाही. स्वतः शरच्चंद्र हे जहाल मतवादी होते. सुभाषचंद्र आणि शरच्चंद्र याचा केवळ परिचय नसून त्यांचे संबंध होते. त्यांच्या मनोवृत्तीचा प्रतीक असा एकच सव्यसाची त्यानी रंगवला. पण असा की, वाचकांच्या मनात तो सदैव तरळत रहावा.

शेवटी हरिभाऊ आणि शरच्चंद्र याच्या साहित्यसृष्टीतील मूलभूत फरक सांगावयाचा झाला तर तो असा सांगता येईल की, ज्याप्रमाणे शरच्चंद्र माणसाच्या आत्म्यालाच नेमका हात घालतात तसे हरिभाऊंना जमत नाही. शरच्चंद्रांची पात्रे आपल्या अंतरंगाला केवळ स्पर्शच करीत नाही तर त्याला हलवून सोडतात. त्यांची पात्रे प्रेम करतात ती देखील उच्च पातळीवरून. त्यात शारीरिक आकर्षणापेक्षा मानसिक आकर्षण असते. आत्म्याच्या आकर्षणाचे स्थूलचित्रण कठीण असल्याने शरच्चंद्रांच्या कादंबऱ्यांना बरीच गूढता आल्याचे दिसून येते, ही गूढता व गाढता हरिभाऊंत फारशी दिसत नाही. कदाचित् त्यामुळे शरदबाबूंच्या कादंबऱ्यांना कालातीतता प्राप्त झालेली असावी. त्यांतील व्यक्तींचे बाह्यस्वरूप लक्षात रहात नसले तरीही ती पात्रे अविस्मरणीय ठरतात. पण हरिभाऊंची पात्रेही काही कमी अविस्मरणीय नाहीत. असे कां? कारण प्रत्येक व्यक्ती ही एका मनोवृत्तीची द्योतक आहे. काही सुष्ट व्यक्ती आहेत तर काही दुष्ट. त्यांचे दर्शन इतक्या ठसठशीतपणे त्यांनी घडवले की, त्यांचा आपला परिचय होताच त्यांची कायमची छाप पडते.

एवढ्या थोर कादंबरीकारांबद्दल एवढ्या मर्यादेत सांगताना संकोच वाटतो. काही ढोबळ विशेषांचाच तेवढा विचार करावा लागला आहे. उद्देश हाच की या दोन साहित्यिकांच्या साहित्याच्या तौलनिक अभ्यासाची एक दिशा दिग्दर्शित करावी. शरच्चंद्रांच्या बहुतेक कादंबऱ्या मराठीत अनुवादित झालेल्या असून कोणालाही त्या वाचून पाहता येण्यासारख्या आहेत. हरिभाऊ तर आपलेच आहेत. तथापि, त्यांच्या कादंबऱ्या नवीन पिढीकडून वाचल्या जात नाहीत. याला कारण तांत्रिक दृष्ट्या सदोष आणि

पाल्हाळिक असल्यामुळे तिकडे फारसे कोणी वळू पाहात नाहीत. तत्कालीन समाजही आता पार बदलला आहे. त्यामुळे एक प्रकारे त्यांना ऐतिहासिक स्वरूप आले आहे. मात्र त्या वाचल्यावर हरिभाऊंचे लेखनकौशल्य व लेखनसामर्थ्य यांचा प्रत्यय आल्याशिवाय राहत नाही. शरच्चंद्राच्या कादंबऱ्या तर कालातीत आहेत.

□ □ □

२२६०५
निबंध२८०

REFBK-0022605

परिशिष्ट १

# शरत्साहित्य दर्शन

## कथा कादंबऱ्या

| | | |
|---|---|---|
| बडी दिदी | अनुपमाय प्रेम | हरिलक्ष्मी |
| पंडित मशाय | अभागीर स्वर्ग | सती |
| अरक्षणीया | श्रीकांत भाग १ ते ५ | परेश |
| वैकुंठेर वित | चरित्रहीन | बाल्यस्मृती |
| मेज दिदी | गृहदाह | षोडशी |
| चंद्रनाथ | पल्ली समाज | बिराज बहु |
| पारिणीता | बामुनेरमेयें | दत्त |
| शुभदा | देना पोता | स्वामी |
| पथेर दाबी | नवविधाक | निष्कृती |
| विप्रदास | विंदुर छेले | सुमती |
| देवदास | छबी | मंदिर |
| कासिनाथ | महेश | हरिचरण |
| शेष प्रश्न | दर्प चूर्ण | कादंविनी |
| अनुराधा | सुप्रभात | विलासिनी |

## नाटचसृष्टी

| | | |
|---|---|---|
| षोडशी | मेन दिदी | अनुराधा |
| रमा | काशीनाथ | सती |
| बिजया | स्वामी | परेश |
| बिराज बहू | हरिलक्ष्मी | सुमती इ |
| बिंदूर छेले | | |

## बोलपट

लेन देन अथवा पुजारीण
गृहबाह अथवा मंझिल
देवदास
काशिनाथ
क्षअरणीया अथवा इन्कार
बडी दिदी
छोटा भाई
शोभा
बिराज बहू
परिणीता

परिशिष्ट २

# शरच्चंद्र चट्टोपाध्याय जीवनपट

जन्म १५ सप्टेंबर १८७६ देवानंदपूर

सन १८९४ वयाच्या १८ व्या वर्षी प्रवेश परीक्षा उत्तीर्ण

सन १९०३ वडीलांचा मृत्यू ( मोतीलाल )

सन १९२२ हावडा काँग्रेस कमिटीचे सभापती

१६ जानेवारी १९३८ मृत्यू.